# युवाराष्ट्र दर्शन

RNI No. MAHMAR/2008/26657

E-mail : yuvarashtradarshan.com

नागपूर, शुक्रवार, दिनांक ६ फेब्रूवारी २०२६ ■ वर्ष १७ ■ अंक ३४४ ■ पाने ८ ■ किंमत रु. २/- +वितरण खर्च रु.१ = एकूण ३ रुपये


## महापौर, उपमहापौर पदासाठी आज निवडणूक

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ५**

नागपूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीतील निवडून आलेल्या सर्व नवनिर्वाचित सदस्यांची पहिली विशेष सभा शुक्रवार ६ फेब्रुवारी रोजी सकाळी ११.०० वाजता रेशीमबाग येथील कविवर्य सुरेश भट सभागृह येथे आयोजित करण्यात आली आहे. सभेत महापौर(महिला), उपमहापौर पदासाठी निवडणूक होणार असून, १६ स्थायी समिती सदस्यांची नियुक्ती केली जाणार आहे. संबंधित विशेष सभेची सूचना मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी नवनिर्वाचित सदस्यांना दिली आहे. या प्रसंगी पीठासीन अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर उपस्थित राहणार आहेत.

नागपूर महानगरपालिकेच्या महापौरपदासाठी भाजपने नगरसेविका श्रीमती नीता ठाकरे यांनी तर काँग्रेसकडून नगरसेविका श्रीमती स्नेहल ठाकरे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. तर उपमहापौरपदासाठी भाजपच्या


नीता ठाकरे (महापौर)


लीला हाथीबेड (उपमहापौर)


स्नेहल ठाकरे (महापौर)


विवेक निकोसे (उपमहापौर)

उमेदवार

नगरसेविका श्रीमती लीला हाथीबेड व काँग्रेसकडून यापदासाठी नगरसेवक विवेक निकोसे यांनी अर्ज दाखल केला.

विशेष सभेला सुरुवात झाल्यानंतर पीठासीन अधिकारी उमेदवारी अर्जांची छाननी करणार आहेत. त्यानंतर उमेदवारी मागे घेण्यासाठी १५ मिनिटांचा कालावधी दिला जाणार आहे.

## विरोधकांना कधीतरी उत्तर द्यावे लागेल : मोदी

### प्रचंड गोंधळात मोदींचे राज्यसभेत भाषण

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली, दि. ५**

२१ व्या शतकाची पहिली २५ वर्षे संपली आहेत. आता २०२६ मध्ये आपण आहोत. १०० वर्षांपूर्वी म्हणजेच १९२५ नंतर भारत स्वतंत्र झाला पाहिजे ही मोहीम जोरदार ठरली होती. २०२६ मध्ये आपण विकासाच्या दिशेने वाटचाल करीत आहोत. आपण एका वळणावर आलो आहोत असे देशातील प्रत्येक व्यक्तीला वाटते. आपल्याला पुढे जायचे आहे मागे पहायच नाही असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यसभेत म्हटले. पंतप्रधान मोदी यांनी भाषण सुरू करताच विरोधकांनी गोंधळ घालायला सुरुवात केली. मनमानी चालू देणार नाही, हुकुमशाही बंद करा, राहुल गांधींना बोलू द्या अशा घोषणा विरोधक देत होते, तरीही मोदी यांनी आपले भाषण सुरूच ठेवले.

राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावर मोदी भाषण देत असताना विरोधकांनी घोषणा देत सभात्याग केला.

आपल्या भाषणात पंतप्रधान मोदी म्हणाले, जगातील समृद्ध देश आता म्हातारे होत चालले आहेत. आपला देश तरुणांचा देश म्हणून उदयास येत आहे. हा एक उत्तम योग आहे. दुसऱ्या बाजूला आपण पाहतो की, जगाला भारताचे आकर्षक वाटत आहे. भारताच्या बुद्धीमत्तेचे आकर्षण सगळ्या देशाला आहे. कारण आपल्याकडे युवकांची कल्पकता, संकल्प आणि सामर्थ्य आहे. आज जगात जी आव्हाने निर्माण होत आहेत त्या आव्हांना उत्तर देणारा देश म्हणून भारताकडे पाहिल्या जाते. आपला देश आशेचा किरण ठरत आहे हा देखील एक सुयोग आहे. देशाची प्रगती आपण वेगाने करीत आहोत असेही मोदी आपल्या भाषणात म्हणाले.



#### बँकांना मुक्त केले

आजारी असलेल्या बँकांना आम्ही आजारपणातून बाहेर काढले. मुद्रा योजनेतंर्गत ३० लाख कोटींचे कर्ज वितरित करण्यात आले. २०१४ च्या पूर्वी काँग्रेसच्या काळात नेत्यांच्या फोनवर मोठमोठी कर्ज दिली जात होती. त्यामुळे थकीत कर्ज सातत्याने वाढत गेले असाही आरोप मोदी यांनी केला. सरकारने बँकिंग क्षेत्रात सुधारणा करीत विश्वास निर्माण केला असून आज थकीत कर्ज एक टक्क्यांपेक्षाही कमी पातळीवर आणण्यात यश आले असेही मोदी आपल्या भाषणात म्हणाले.

#### करोनानंतर बरीच ? उलथापालथ

आपला देश स्वतंत्र झाला त्यावेळी अर्थव्यवस्थेच्या बाबतीत आपण सहाव्या क्रमांकावर होतो. काँग्रेसच्या कार्यकाळात तो ११ व्या क्रमांकावर गेला. आता आमच्या कार्यकाळात देशाच्या अर्थव्यवस्थेची वाटचाल तिसऱ्या क्रमांकाकडे झेप घेत आहे. करोनानंतर जगात बरीच उलथापालथ झाली. अजुनही जग सावरू शकले नाही. दुसऱ्या महायुद्धानंतर एक वर्ल्ड ऑर्डर तयार झाली होती. आता एक वर्ल्ड ऑर्डर तयार होत आहे. या सर्व घटनांकडे पाहिले, तर झुकत माप हे भारताकडे आहे. भारत विश्वमित्र म्हणून उदयास आला आहे. विश्व कल्याणाच्या दृष्टीने आपण आपली भूमिका बजावत आहोत. ९ देशांशी विविध करार केले आहेत. जे लोक थकले आणि निघून गेले. परंतु, त्यांना कधी ना कधी याचे उत्तर द्यावे लागणार आहे. त्यांनी देशाची अशी अवस्था का करून ठेवली होती की, जगातील एकही देश भारताकडे पहात नव्हता असा टोला देखील त्यांनी घोषणा देणाऱ्या काँग्रेसला लगावला. यावेळी त्यांनी पं. जवाहरलाल नेहरू आणि इंदिरा गांधी यांचाही उल्लेख केला. भारत आता सक्षम झाला आहे. भारत जगाशी स्पर्धा करू शकतो यात शंका नाही असेही ते म्हणाले.

## पार्थला क्लिन चिट नाही : दमानिया

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ५**



पुण्यातील मुंढवा जीमन व्यवहारप्रकरणी पार्थ पवार यांना क्लिन चिट मिळूच शकत नाही असा दावा सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी पत्रपरिषदेतून केला.

या पत्रपरिषदेत दमानिया यांनी पार्थ पवार आणि शितल तेजवानी यांच्यात झालेली पॉवर ऑफ अटर्नी देखील दाखविली. पार्थ पवारच नाव चार्जशिटमध्ये नाही असे होऊच शकत नाही. ती चार्जशिट ही शितल तेजवानीला जामीन मिळू नये यासाठी होती. यासंदर्भात एक पूर्ण प्रिंटआऊट काढले आहे. पार्थ पवार यांनी पॉवर ऑफ अटर्नी शितल तेजवानी आणि पार्थ यांच्यात झाला होता. यात प्रत्येक पानावर त्यांचे नाव आहे. इतकेच नाही, तर पार्थची छायाचित्रे, शिक्का आणि त्यावर त्यांची सही व खाली साक्षीदारांची सही आहे. या व्यवहाराची प्रत खारगे समितीला दिली आहे. त्यामुळे खारगे समिती त्यांना यातून क्लिन चिट देऊच शकत नाही. यातून पार्थला बाहेर काढले, तर खारगे समितीला धारेवर धरणार आहे. अहवाल मॅनेज केला, तरी उच्च न्यायालयात जाऊन मी बाजू मांडणार आहे. हा लढा सुरूच राहणार असल्याचे पुढे त्यांनी पत्रकारांना सांगितले.

## काँग्रेस नगरसेवकांसाठी निवासी प्रशिक्षण शिबीर

**मुंबई, दि. ५ :** प्रदेश काँग्रेसने नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणुकीत निवडून आलेल्या पक्षाच्या उमेदवारांसाठी तीन दिवसांच्या निवासी प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन केले आहे. या उपक्रमाच्या पहिल्या टप्प्यात कोकण विभागातील नगरसेवकांचे शिबीर २७, २८ फेब्रुवारी आणि १ मार्च रोजी चिपळूण येथे होईल. या शिबिराला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यासह पक्षाचे प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत. तसेच सामाजिक कार्यकर्ते आणि संबंधित विषयातील तज्ज्ञ उमेदवारांना मार्गदर्शन करणार आहेत. लहान शहरे आणि निमशहरी भागातील नागरी समस्या, नागरिकांना भेडसावणाऱ्या अडचणी, त्यावरील उपाययोजना याबाबत नगरसेवकांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

## ओला-उबेरलाटक्कर देण्यासाठी आता भारत टॅक्सी

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली, दि. ५**

ओला-उबेरा दिग्गज कंपन्यांना टक्कर देण्यासाठी आता भारतात भारत टॅक्सी सुरू करण्यात आली असून केंद्रीय सहकारमंत्री अमित शहा यांच्या हस्ते भारत टॅक्सीची सेवा अधिकृत लाँच करण्यात आली आहे. भारत टॅक्सीच्या सेवेमुळे प्रवासी आणि चालकांना मोठ्या प्रमाणात फायदा होणार आहे.

सहकार टॅक्सी को. ऑपरेटिव्ह लिमिटेडद्वारे भारत टॅक्सी संचालित असून मल्टी स्टेट को. ऑप. सोसायटीज ॲक्ट २००२ अंतर्गत त्याची नोंदणी झाली आहे. ओला, उबेरचे चालक हे स्वतंत्र कंत्राटदार आहेत. मात्र, भारत टॅक्सीच्या चालकांना सारथी म्हटल्या जाते. ते या संस्थेचे सभासद आणि सहमालक आहे. प्रत्येक सारथीकडे संस्थेचे शेअर्स आहेत. सुरक्षा आणि सर्वसमावेशकता हा भारत टॅक्सीचा मुख्य आधार आहे. त्यांच्या १५० हून अधिक बाईकदीदी महिला चालक आधीच या प्लॅटफॉर्मशी जोडल्या गेल्या आहेत. भारत टॅक्सी हे चालकांच्या मालकीचे सहकारी मॉडेल आहे. प्रत्येक चालक हा मालक/भागधारक आहे. त्यांच्याकडून प्रती राईड कमिशन घेतल्या जात नाही. दररोज ३० रुपयांचा भरणा करून उरलेली कमाई स्वत:कडे ठेवतात. ओला, उबेरपेक्षा भारत टॅक्सीचे भाडे स्वस्त आहे. पाऊस असो की, जादा मागणी असो दर बदलत जात नाहीत. भारत टॅक्सीने पोलिसांशी समन्वय साधला असून त्यात वन टॅप एसओएस बटन, आपत्कालीन संपर्क अलर्ट आणि ॲपमधील सायरन बटन यासारख्या सुविधा आहेत. भारत टॅक्सीमध्ये रिक्षा, बाइक किंवा कार यापैकी एक पर्याय प्रवाशांना निवडता येईल. बुकिंग करण्यापूर्वी अंदाजित भाडे दिसेल.




#### भारत टॅक्सीचे दर

किमान भाडे पहिल्या चार किमीपर्यंत ३० रुपये, ४ ते १२ किमी २३ रुपये प्रती किमी, १२ किमीनंतर १८ रुपय प्रती किमी असे दर आहेत.

## वाहनाच्या धडकेत तरुण ठार

**नागपूर, दि. ५ :** भरधाव असलेल्या अज्ञात चारचाकी वाहनाच्या चालकाने दुचाकीस्वार तरुणाला जबर धडक दिली आणि पसार झाला. यात गंभीर जखमी तरुणाचा उपचार मिळण्यापूर्वीच मृत्यू झाला. अपघाताची ही घटना हुडकेश्वर पोलिस ठाण्यांतर्गत घडली. रोशन बालाजी झाडे (२५) रा. विद्यानगर, हुडकेश्वर असे मृत तरुणाचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारी सकाळी ७ वाजताच्या सुमारास रोशन हा एमएच-४९/सीमू ३०४७ क्रमांकाच्या दुचाकी वाहनाने कामानिमित्त जात होता.

## कल्याण-डोंबिवलीच्मुंबईत परतफेड

### एकनाथ शिंदेंना महत्त्वाची पदे नाकारली

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ५**

मुंबई महानगरपालिकेवर आपला झेंडा फडकवण्यासाठी सज्ज झालेल्या भाजप आणि एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेच्या युतीत सत्तेच्या वाटपावरून नवीन ठिणगी पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ७ फेब्रुवारीला महापौर आणि उपमहापौर पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल होणार आहेत, त्यापूर्वीच भाजपने आक्रमक पवित्रा घेतला आहे. कल्याण-डोंबिवली आणि उल्हासनगरमध्ये आम्ही त्याग केला, आता मुंबईत आम्हाला पूर्ण मोकळीक द्या, अशी भूमिका घेत भाजप नेत्यांनी शिंदेंच्या शिवसेनेला उपमहापौर आणि मलाईदार मानले जाणारे स्थायी समिती अध्यक्षपद देण्यास विरोध दर्शवला आहे.

मुंबई महापालिकेत भाजपने ८९ जागांवर विजय मिळवून सर्वात मोठा पक्ष होण्याचा मान मिळवला आहे, तर एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेला २९ जागांवर समाधान मानावे लागले आहे. जरी भाजप सर्वात मोठा पक्ष असला, तरी बहुमताचा जादुई आकडा गाठण्यासाठी त्यांना शिंदेंच्या शिवसेनेची गरज आहे. दोन्ही पक्षांनी कोकण विभागीय आयुक्तांकडे गटनोंदणी करून आपण एकत्र असल्याचे यापूर्वीच स्पष्ट केले आहे. त्यामुळे महापौर भाजपचा आणि



उपमहापौर व स्थायी समिती अध्यक्षपद शिंदेंच्या गटाला मिळेल, असे साधे गणित मांडले जात होते.

मात्र, आता पडद्यामागच्या हालचाली वेगळ्याच दिशेने सुरू आहेत. भाजपमधील एका वरिष्ठ गटाने युक्तिवाद केला आहे की, ठाणे जिल्ह्यातील कल्याण-डोंबिवली आणि उल्हासनगर महापालिकेत भाजपने महापौरपदावरचा आपला हक्क सोडून तो एकनाथ शिंदेंच्या गटाला दिला होता. त्या त्यागाची परतफेड आता मुंबईत व्हावी. मुंबई महापालिकेचे महत्त्व आणि अर्थकारण पाहता, येथील उपमहापौर आणि तिजोरीच्या चाव्या असलेली स्थायी समिती ही दोन्ही महत्त्वाची पदे भाजपकडेच असावीत, असा आग्रह धरण्यात येत आहे.

त्यामुळे अवघ्या दोन दिवसांवर आलेल्या अर्ज भरण्याच्या प्रक्रियेत भाजप आपल्या मित्रपक्षाला सत्तेत योग्य वाटा देणार की कल्याण-डोंबिवलीचा दाखला देत मुंबईत त्यांना दुय्यम वागणूक देणार, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

## अजित पवारांचे स्मारक बारामतीतच होणार : पवार

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ५**

अजित पवार यांच्या निधनानंतर बारामती येथे त्यांचे स्मारक उभारण्यासाठी जोरदार हालचाली सुरू झाल्या असून गुरुवारी खासदार शरद पवार यांच्या नेतृत्वात जय पवारांसोबत झालेल्या बैठकीत बारामतीतील विद्या प्रतिष्ठान येथे स्मारकासाठी जागा निश्चित झाल्याची माहिती आमदार रोहित पवार यांनी दिली.

या बैठकीला शरद पवार, प्रतिभा पवार, श्रीनिवास पवार, राजेंद्र पवार, रणजीत पवार, रोहित पवार आणि विद्या प्रतिष्ठानचे काही विश्वस्त उपस्थित होते. रोहित पवार यांनी सांगितले, अजित पवार प्रचाराला जात असताना विमान अपघातात त्यांचा मृत्यू झाला. आज प्रचाराचा शेवटचा दिवस आहे. अजित पवार मोठे नेतृत्व होते. तेथे लोकांनी सहकार्य करावे असे आवाहन



देखील त्यांनी केले.

शरद पवार हे पवार कुटुंबियांचे केंद्रबिंदू आहेत. राजकीय, सामाजिक दृष्टीकोनातून त्यांचे कार्य मोठे आहे. पवार कुटुंबियांना किंवा अजित पवार यांना ज्या ज्या वेळी अडचणी आल्या त्यावेळी शरद पवार हे कुटुंबियांसोबत खंबिरपणे उभे राहिले आहेत. आज अजित पवार नसले, तरी शरद पवारांचे मार्गदर्शन आम्हाला मिळत आहे. जय,

#### ९ तारखेनंतर बोलणार

रोहित पवार यांनी सांगितले की, विमानात काय घडल, कस घडल यासंदर्भात ९ तारखेनंतर भाष्य करू. जी माहिती आमच्याकडे आहे, काही माहिती आम्ही मागत आहोत. खरी वस्तुस्थिती लोकांसमोर येणे आवश्यक आहे असेही पवार म्हणाले.

पार्थ आणि सुनेत्रा काकी आम्ही सर्वजण शरद पवारांच्या मार्गदर्शनाखाली काम करतो. अजित पवार यांचे चांगले स्मारक व्हावे अशी आम्हा सर्वांची इच्छा आहे. त्या स्मारकावर येणाऱ्या लोकांना दर्शन घेता येईल त्यासाठी जागेची निवड करण्याचे काम सुरू आहे. स्मारक बारामती येथे की, दुसऱ्या ठिकाणी यासंदर्भात देखील चर्चा झाली आहे.

## १,८७८ वाहन चालकांवर कारवाई

**नागपूर, दि. ५ :** वाहतूक शाखा पोलिसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकूण १,८७८ वाहन चालकांवर कारवाई करून १,३२,९०० रुपयांचा दंड वसूल केला. त्याचप्रमाणे शहर पोलिसांनी महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये ३ व एनडीपीएस अन्वये १ अशा ४ प्रकरणात ६ आरोपींवर कारवाई करून ३,९०,१६० रुपयांचा माल जप्त केला.

## ३६ तास नरकयातना आणि महिलांचे अतोनात हाल

### सरकारला प्रवाशांच्या जीवाचे काहीच मोल नाही का ?

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ५**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर मृत्यूचा सापळा बनलेल्या गॅस टँकरमुळे तब्बल ३६ तास वाहतूक ठप्प झाली आणि हजारो प्रवाशांना अक्षरशः नरकयातना भोगाव्या लागल्या. हायस्पीड, स्मार्ट हायवे अशी बिरुदावली लावणाऱ्या या मार्गावर प्रशासनाचा थर्ड क्लास कारभार पुन्हा एकदा उघडा पडला आहे. गॅस गळती रोखण्यात आणि रस्ता मोकळा करण्यात यंत्रणेला ३६ तास लागतात, हेच मुळात प्रशासनाच्या नाकर्तेपणाचे लक्षण आहे. या भयंकर दिरंगाईमुळे वाहनचालक, लहान मुले आणि विशेषतः महिलांचे जे हाल झाले, त्याला जबाबदार कोण? केवळ टोलनाक्यावर वसुलीसाठी तत्पर असणाऱ्या पोलिसांना आणि प्रशासनाला अडकलेल्या प्रवाशांच्या वेदनांची काहीच किंमत नाही का? असा संतप्त सवाल आता संपूर्ण महाराष्ट्रातून विचारला जात आहे.

अपघात झाल्यानंतर सुरक्षेसाठी वाहतूक थांबवणे योग्य होते, पण ती पूर्ववत करण्यासाठी कोणताही कृती आराखडा सरकारकडे नव्हता का? भर उन्हात आणि रात्रीच्या अंधारात लाखो लोक उपाशी-तापाशीगाडीत खितपत पडले होते. यात महिलांची अवस्था अत्यंत दयनीय झाली होती. नैसर्गिक विधीसाठी कोणतीही सोय नसताना महिलांनी ३६ तास काढले कसे असतील, याचा विचारही या सरकारला शिवला नाही. उलट, वाहतूक सुरू झाल्यावर ३६ तास जागून थकलेल्या आणि झोप लागलेल्या चालकांना माणुसकीने जागे करण्याऐवजी पोलिसांनी अरेरावी केल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. पोलिसांची ही भूमिका अत्यंत असंवेदनशील आणि चीड आणणारी होती.



या प्रकारावर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सरकारवर सडकून टीका केली आहे. ते म्हणाले, रस्ते बांधणे आणि फक्त टोल वसूल करणे इतकेच सरकारचे काम आहे का? मुंबई-पुणे राज्याची विकासाची इंजिनं आहेत, पण ती ३६ तास ठप्प होतात आणि सरकार ढिम्म असते, हा कोडगेपणा अनाकलनीय आहे. अर्थसंकल्पात बुलेट ट्रेनच्या गप्पा मारण्याआधी सध्याचे रस्ते सुधारा. ज्या प्रवाशांकडून या काळात टोल वसूल केला, तो त्यांना परत करा आणि नुसत्या चौकशांचे फार्स बंद करा. विधानपरिषदेचे माजी विरोधी पक्षनेते आणि शिवसेना (उबाठा) नेते अंबादास दानवे यांनीही सरकारच्या निष्काळजीपणाचे वाभाडे काढले आहेत. हे सरकार फक्त खोके आणि सत्तेच्या साठमारीत मग्न आहे. सर्वसामान्य माणूस रस्त्यावर मेला तरी यांना काही फरक पडत नाही. आपत्ती व्यवस्थापन नावाची गोष्टच शिल्लक नाही. राज्याला पालकमंत्री आहेत की नाहीत? ३६ तास रस्ता बंद पडतो आणि एकही जबाबदार मंत्री घटनास्थळी फिरकत नाही, यावरूनच सरकारची लायकी कळते, अशा शब्दांत दानवे यांनी संताप व्यक्त केला आहे.

एकिकडे प्रशासन गॅस गळतीचे तांत्रिक कारण पुढे करत आहे, तर दुसरीकडे ३६ तासांच्या कोंडीने प्रवाशांचा संयम तोडला आहे. हा केवळ अपघात नव्हता, तर हे नियोजनाचे अपयश होते. आता तरी हे टोल-सम्राटसरकार जागे होणार की आणखी बळींची वाट पाहणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## पोलिस-नक्षल्यकमकीत एक नक्षलवादी ठार, अनेक जखमी

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**गडचिरोली, दि. ५**

काल ४ फेब्रुवारीला नक्षलवादी आणि पोलिसांमध्ये काही काळ चाललेल्या चकमकीत एका माओवादीला पोलिसांनी गोळीबार केले. आणि काही जण जखमी झाले असण्याची शक्यता आहे. दोन नक्षलवादी छावण्या उद्ध्वस्त करण्यात आल्या असून मोठ्या प्रमाणात नक्षलवादी साहित्य जप्त करण्यात आले आहे. तथापि, प्रतिकूल भूभाग आणि घनदाट जंगलामुळे माओवाद्यांचा शोध घेता आला नाही, असे पोलिसांनी आज सांगितले.



*या घटनेनंतर पोलिसांनी राबविलेल्या सर्च ऑपरेशनमध्ये घटनास्थळी सापडलेले नक्षल्यांचे साहित्य*

या चकमकीत एका पोलिस जवानालाही गोळी लागली आहे. ३ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी कंपनी क्रमांक १० च्या उर्वरित कार्यकर्त्यांबद्दल आणि छत्तीसगडमधील अज्ञात पथकाबद्दल मिळालेल्या विश्वासार्ह माहितीच्या आधारे, त्याच रात्री एसडीपीओ भामरागड यांच्या नेतृत्वाखाली १४ सी-६० युनिट्ससह फोडेवाडा गावापासून काही किलोमीटर अंतरावर नारायणपूर-गडचिरोली सीमेवर नक्षलविरोधी मोहीम सुरू करण्यात आली.

आज सकाळी, सी-६० युनिट्स आणि १ सीआरपीएफ युनिट क्यूएटीला सध्याच्या घेरावात आणण्यात आले. सकाळपासून माओवाद्यांशी अधून मधून गोळीबार सुरू आहे. आतापर्यंत १ एके-४७ आणि १ एसएलआर शस्त्रांसह एका पुरुष माओवाद्याचा मृतदेह सापडला आहे. आणखी माओवादी जखमी किंवा ठार होण्याची शक्यता आहे. मृत पुरुष माओवाद्याची ओळख अद्याप पटू शकलेली नाही, असे पोलिसांनी सांगितले.

आज संध्याकाळी उशिरा माओवाद्यांनी केलेल्या जोरदार गोळीबारात सी-६० जवानांपैकी एका जवानाला एक गोळी लागली आहे. त्याला बाहेर काढण्याची प्रक्रिया सुरू आहे. परिसरात ऑपरेशन सुरू आहे.

### मुंबईत पल्स वैद्यकीय परिषदेचे आयोजन

## परिषदेच्या माध्यमातून महाराष्ट्र ब्रँड निर्माण करा : फडणवीस

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ५**



वैद्यकीय क्षेत्रात जागतिक स्तरावर महाराष्ट्राला ओळख निर्माण करून देणाऱ्या पल्स या वैद्यकीय परिषदेचे आयोजन मुंबईत जिओ वर्ल्ड सेंटर येथे २७ आणि २८ मार्च २०२६ रोजी करण्यात येणार आहे. या परिषदेत देशातून आणि जगभरातून वैद्यक क्षेत्रातील २ हजार ९०० पेक्षा जास्त तज्ज्ञ, अभ्यासक आणि मान्यवर सहभागी होणार आहेत. त्यामुळे या परिषदेच्या माध्यमातून वेलनेस उपचारांचा वैद्यकीय पर्यटनातील महाराष्ट्र ब्रँड निर्माण करावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी वर्षा निवासस्थानी परिषद आयोजनाच्या आढावा बैठकीत दिले.

पारंपरिक खर्चिक असलेल्या वैद्यकीय उपचाराऐवजी वेलनेस उपचारांकडे नागरिकांचा ओढा वाढत आहे. वेलनेस उपचार पद्धतीत राज्यात मोठ्या प्रमाणावर वाव आहे. त्यामुळे आयुषमधील उपचार पद्धतींना वेलनेस कडे वळविण्यात यावे, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

वैद्यकीय क्षेत्रामध्ये अनेक स्टार्टअप कार्यरत आहेत. अधिकाधिक स्टार्टअपला परिषदेत सहभागी करून घ्यावे. जेणेकरून परिषदेमध्ये या क्षेत्रात होणाऱ्या नवनवीन संशोधनावर आधारित चर्चांमधून कर्करोगासारख्या आजारांवर सहज, सोपी आणि परवडणारी उपचार पद्धती विकसित करण्यात स्टार्टअपला मदत होईल. वैद्यकीय क्षेत्रातील जागतिक गुंतवणूकदार या परिषदेत सहभागी होतील, याबाबत दक्षता घ्यावी. त्यांच्या माध्यमातून राज्यात होत असलेल्या बल्क ड्रग पार्क मध्ये गुंतवणूक होईल, यासाठी प्रयत्न करावे. परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी संबंधित विभागांनी नोडल अधिकारी नियुक्त करावेत. सबंधित विभागांनी समन्वयाने काम करत परिषदेच्या आयोजनातून राज्याला वैद्यकीय क्षेत्रात मोठा लाभ मिळवून द्यावा, अशी सूचनाही फडणवीस यांनी यावेळी केली.

## रस्ते विकास प्रकल्पाच्या नावाखाली ५ कोटींची फसवणूक

### मेरठच्या तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ५**

रस्ते विकास प्रकल्पाचे कंत्राट मिळवून देण्याच्या नावाखाली मुंबई आणि नागपुरातील दोन बांधकाम कंपन्यांना ५ कोटी रुपयांचा गंडा घालण्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी सीताबर्डी पोलिस ठाण्यात उत्तर प्रदेशातील मेरठ येथील तीन भामट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे सोपवण्यात आला आहे.

माहितीनुसार, दिग्विजय श्रद्धा इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. (मुंबई) चे अधिकृत स्वाक्षरीकर्ता नितेश विनयकुमार संकलेचा (५६, शिवाजीनगर) यांनी या प्रकरणी तक्रार दिली आहे. त्यांची आणि शेजारीच कार्यालय असलेले सरला प्रोजेक्ट वर्क्सचे मनोज सिन्हा यांची ओळख आरोपी अजयकुमार, विजयकुमार आणि नितीन त्यागी (तिघेही रा. मेरठ, उत्तरप्रदेश) यांच्याशी झाली होती.

आरोपींनी स्वत:ला जे इन्फाशियन कन्स्ट्रक्शनचे संचालक असल्याचे भासवले. दिल्ली आणि ईशान्य भारतात आपली मोठी कंपनी असून आपल्याकडे १ हजार कोटी रुपयांची कामे असल्याचे त्यांनी सांगितले. महाराष्ट्रातील रस्ते विकास प्रकल्पात एकत्रित काम करण्याची ऑफर देऊन आरोपींनी दोन्ही कंपन्यांचा विश्वास संपादन करीत फसवणूक केली. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच नितेश संकलेचा यांनी पोलिसांत धाव घेतली. अर्जाच्या चौकशीनंतर सीताबर्डी पोलिसांनी आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## एलएनजी पंपावरून दुचाकी चोरणारा ताब्यात

**नागपूर, दि. ५**

कुही पोलिस स्टेशनच्या हद्दीतील कळमना येथील एलएनजी पंपावरून दुचाकी चोरणा-या एका विधीसंघर्षग्रस्त बालकाला गुन्हे शाखा युनिट क्रमांक ३ च्या पथकाने ताब्यात घेतले आहे. त्याच्याकडून चोरीची दुचाकी जप्त करण्यात आली असून त्याला पुढील कारवाईसाठी कुही पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

पाचगाव येथील रहिवासी प्रवीण बाबुलाल गावळे (२४) हे कळमना येथील एलएनजी पंपावर सुरक्षा रक्षक म्हणून कार्यरत आहेत. १ फेब्रुवारी रोजी पहाटे ३ वाजेच्या सुमारास त्यांनी आपली दुचाकी (एमएच ४० बीआर ५६५८) पंपावर उभी केली होती. कर्तव्यावर असताना त्यांना झोपेची डुलकी लागली, याच संधीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने ३० हजार रुपये किमतीची दुचाकी लंपास केली. याप्रकरणी कुही पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा समांतर तपास गुन्हे शाखा युनिट क्रमांक ३ चे पथक करत होते. गस्तीवर असताना मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे पोलिसांनी एका संशयित विधीसंघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेतले.

## आ.सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारामुळे पोंभुर्णा ग्रामीण रुग्णालयातील पाणीटंचाईवर तोडगा

युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी
**चंद्रपूर दि.५ :** राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारामुळे पोंभुर्णा येथील ग्रामीण रुग्णालयात निर्माण झालेल्या पाणीटंचाईच्या गंभीर समस्येवर तोडगा काढण्यात आला आहे. लॉईड मेटल घुग्घुसच्या माध्यमातून विहीर बांधकाम आणि पंप बसविण्यासाठी ११ लाख ५२ हजार ३८८ रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. आमदार श्री. मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून, त्यामुळे रुग्णालयातील पाणीपुरवठ्याचा प्रश्न मार्गी लागणार आहे.ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांसाठी पिण्याच्या पाण्याची तसेच दैनंदिन वापरासाठी पाण्याची उपलब्धता अत्यंत महत्त्वाची असते. मात्र पोंभुर्णा ग्रामीण रुग्णालयात पाण्याच्या अपुऱ्या सुविधांमुळे रुग्ण, त्यांच्या नातेवाईकांना तसेच वैद्यकीय कर्मचाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. रुग्णालयातील दैनंदिन कामकाजावरही याचा परिणाम होत असल्याच्या तक्रारी समोर येत होत्या.ही बाब लक्षात येताच आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी तातडीने संबंधित विभागांकडे पाठपुरावा करत पाणी टंचाईवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी प्रयत्न सुरू केले. त्यांच्या प्रयत्नांना यश आले असून लॉईड मेटल घुग्घुसतर्फे आवश्यक निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीतून रुग्णालय परिसरात नव्याने विहीर बांधण्यात येणार आहे, त्यावर पंप बसवून पाणीपुरवठ्याची सक्षम व्यवस्था उभारली जाणार आहे.

# महापौर पदासाठी १० तर उपमहापौरसाठी ६ नामनिर्देशनपत्र दाखल

युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी
**चंद्रपूर दि.५ :** महानगरपालिकेतील सत्तास्थापनेच्या पार्श्वभूमीवर महापौर व उपमहापौर पदासाठी दाखल झालेल्या नामनिर्देशनांमुळे राजकीय हालचालींना चांगलाच वेग आला आहे.महापौर पदासाठी एकूण १० उमेदवारांनी आपली नामनिर्देशनपत्रे दाखल केली असून, उपमहापौर पदासाठी ६ उमेदवार रिंगणात उतरले आहेत. नामनिर्देशन प्रक्रियेच्या ५ फेब्रुवारी रोजी नामांकन दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी महापालिका मुख्यालयात मोठी वर्दळ पाहायला मिळाली. विविध पक्षांच्या नगरसेवकांसह समर्थकांची उपस्थिती लक्षणीय होती.

महापौर पदासाठी दाखल झालेल्या नामनिर्देशनांमध्ये भारतीय जनता पार्टीकडून ५, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसकडून ४, तर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाकडून १ असे एकूण १० नामनिर्देशनपत्र दाखल झाले आहे.तर उपमहापौर पदासाठी भारतीय जनता पार्टीकडून २, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसकडून २, भारतीय शेतकरी कामगार पक्षाकडून १, तसेच अपक्ष १ असे एकूण ६ नामनिर्देशनपत्र दाखल करण्यात आले आहे.

सत्ताधारी व विरोधी गटांकडून आपापली ताकद दाखवण्याचा प्रयत्न सुरु असून, शेवटच्या क्षणापर्यंत समीकरणे बदलण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. काही पक्षांनी अधिकृत उमेदवार जाहीर केले असले तरी काही ठिकाणी बंडखोरीचे सूरही ऐकायला मिळत आहेत. त्यामुळे माघारीच्या दिवशी चित्र स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

महापौर व उपमहापौर पदाची निवडणूक ही प्रतिष्ठेची मानली जात असून, कोणत्या गटाच्या पारड्यात सत्ता जाते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. आगामी काही दिवसांत राजकीय घडामोडींना आणखी वेग येण्याची शक्यता असून, सत्तास्थापनेचे अंतिम चित्र १० फेब्रुवारी रोजी स्पष्ट होणार आहे.महापौर व उपमहापौर पदांच्या निवडीसाठी पिठासीन अधिकारी जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या अध्यक्षतेखाली १० फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता मनपा राणी हिराई सभागृहात विशेष सभा आयोजित करण्यात आली आहे.

या सभेमध्ये पिठासीन अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्यात येणार असून, छाननीअंती वैध उमेदवारांची नावे जाहीर केली जातील. त्यानंतर १५ मिनिटांच्या कालावधीत लेखी नोटीस देऊन उमेदवारी मागे घेता येणार आहे. पुढे निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची नावे घोषित करून हात वर करून मतांची नोंद घेण्यात येणार असून, उक्त प्रक्रियेनंतर पिठासीन अधिकारी निवडणूक निर्णयाची घोषणा करणार आहेत.

### महापौर पदाचे उमेदवार



महापौर पदासाठी नामनिर्देशन दाखल करणाऱ्या उमेदवारांमध्ये शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाकडून मनस्वी संदीप गिन्हे, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाकडून संगीता मंगल भोयर, संगीता गोपालकृष्ण अमृतकर, सुनंदा दिलीप धोबे व वैशाली अजय महाडूळे, तर भारतीय जनता पार्टीकडून संगीता राजेंद्र खांडेकर (३ अर्ज) व सारिका सचिन संदुरकर (२ अर्ज) यांचा समावेश आहे.

### उपमहापौर पदाचे उमेदवार



उपमहापौर पदासाठी नामनिर्देशन दाखल करणाऱ्या उमेदवारांमध्ये भारतीय जनता पार्टीकडून संजय नारायण कंचर्लावार (२ अर्ज), भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाकडून वसंत राजेश्वर देशमुख, राहुल गेंदलाल चौधरी, भारतीय शेतकरी कामगार पक्षाकडून प्रदीप शंकर देशमुख, अपक्ष उमेदवार प्रशांत आनंदराव दानव यांचा समावेश आहे.

# भाजप व काँग्रेस समोर संख्याबळ जुळविण्याची कसोटी

युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी
**चंद्रपूर दि.५ :** महानगरपालिकेत सत्ता स्थापनेच्या दृष्टीने निर्णायक टप्पा जवळ येत असताना संख्याबळ जुळविण्याची खरी कसोटी भाजप व काँग्रेससमोर उभी राहिली आहे. महापौर व उपमहापौर निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दोन्ही प्रमुख पक्षांकडून जोरदार मोर्चेबांधणी सुरु असून, प्रत्येक नगरसेवकाचे मत अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे.
भाजपकडून संख्याबळाची गणिते अचूक बसवण्यासाठी वरिष्ठ नेत्यांकडून हालचाली वाढविण्यात आल्या आहेत. अपक्ष तसेच छोट्या गटांशी संपर्क साधून पाठिंबा मिळवण्याचे प्रयत्न सुरु असून, एकत्रित गटनोंदणीवरही भर दिला जात आहे. पक्षाकडून 'स्थिर व सक्षम नेतृत्व' देण्याचा दावा करण्यात येत आहे.




दुसरीकडे काँग्रेससमोरही मोठे आव्हान उभे आहे. पक्षातील अंतर्गत मतभेद, दोन गटांतील समन्वय आणि गटनोंदणीचा प्रश्न अद्याप पूर्णतः मार्गी लागलेला नसल्याने संख्याबळ एकवटण्याची प्रक्रिया अवघड ठरत आहे. तरीही मित्र पक्षांच्या मदतीने सत्ता राखण्यासाठी काँग्रेसकडून प्रयत्नांची पराकाष्ठा करण्यात येत आहे.या सत्तासंघर्षात शिवसेना (उबाठा), अपक्ष तसेच इतर लहान पक्षांची भूमिका निर्णायक ठरणार आहे. कोणता गट कोणासोबत जातो, यावर महापौरपदाचे चित्र अवलंबून असून, शेवटच्या क्षणापर्यंत राजकीय नाट्य रंगण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.महापौर व उपमहापौर निवडणुकीचा निकाल केवळ एका पदापुरता मर्यादित न राहता पुढील अडीच वर्षांच्या महापालिकेच्या कारभाराची दिशा ठरवणारा ठरणार असल्याने,भाजप व काँग्रेससाठी ही संख्याबळाची कसोटी अत्यंत निर्णायक ठरणार आहे.

### शिवसेना (उबाठा) कडून महापौर पदासाठी नामांकन अर्ज दाखल

महानगरपालिकेतील महापौर पदाच्या निवडणुकीसाठी राजकीय वातावरण तापले असताना शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाकडून महापौर पदासाठी अधिकृत उमेदवाराचे नामांकन दाखल करण्यात आले आहे. या नामांकनामुळे महापौर निवडणुकीतील सत्तासमीकरणांमध्ये महत्त्वाची घडामोड मानली जात आहे.
नामांकन दाखल करण्याच्या वेळी शिवसेना (उबाठा) गटाचे नगरसेवक, पदाधिकारी व समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिवसेना (उबाठा) व वंचित यांनी मिळून ८ नगरसेवकांची गटनोंदणी केली आहे.महाविकास आघाडीतील घटक पक्ष असलेल्या काँग्रेससोबतच राहण्याचे संकेत शिवसेना पक्षश्रेष्ठींकडून देण्यात आले. मात्र शिवसेना (उबाठा) ने महापौर पदासाठी नामांकन अर्ज दाखल केल्याने काँग्रेसच्या भूवया उंचावल्या आहेत.१० फेब्रुवारी रोजी नामांकनानंतर माघारीच्या दिवशी चित्र स्पष्ट होणार असले तरी, शिवसेना (उबाठा) कडून उमेदवार रिंगणात उतरवल्याने महापौर निवडणूक अधिकच चुरशीची होणार असल्याचे संकेत मिळत आहेत. आगामी काही दिवसांत सत्तास्थापनेच्या दृष्टीने राजकीय घडामोडींना आणखी वेग येण्याची शक्यता आहे.

## मोटारपंप चोरट्यास घातल्या बेडया, ब्रम्हपुरी पोलीसांची कारवाई

युवाराष्ट्र दर्शन/तालुका प्रतिनिधी
**ब्रम्हपुरी दि.५ :** ब्रम्हपुरी पोलीस ठाणे येथे दि.२ फेब्रुवारी रोजी फिर्यादी नामे सोमेश्वर श्रीराम दवे रा. सोनेगाव ता. ब्रम्हपुरी यांनी पोस्टेला येथून तक्रार दिली की, शेतात पाणी करण्यासाठी नदीमध्ये लावलेले मोटार पंप कोणीतरी अज्ञात इसमाने नट बोल्ड काढून चोरून नेल्याची तक्रार दिल्याने पोस्टे अप क्रमांक ११६/२०२६ कलम ३०३ (२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.
सदर गुन्ह्याचे तपासामध्ये आरोपी व मोटारपंप शोध कामी सपोनी खडसे सा व सोबत डी.बी. स्टॉप पोस्टे परीसरात शोध घेत असतांना मुखबिरद्वारे खबर मिळाली की, मौजा सोनेगाव शेतशिवारात दोन ईसम मोटारपंप मधील तांबा काढूण व मोटारपंप शेतात लपवून ठेवल्याची खात्रिशीर खबर मिळाल्याने नमुद आरोपी क्रमांक ०१. अनिल रामाजी मंद ०२. राजू साहदेव चावने दोन्ही रा. सोनेगाव यांना ताब्यात घेवून विश्वासात घेवुन विचारपुस केली असता त्यांनी सांगीतले की, मौजा सोनेगाव येथील नदीघाटवरील ३ एच.पी. ची मोटार पंप चोरुन नेल्याचे सांगीतले वरुन त्यांना विश्वासात घेवुन विचारपुस केली असता त्यांनी मौजा सोनेगाव येथील नदीघाटावरील ईतर दोन मोटार पंप तसेच बेटाळा येथील नदीनाल्यामधील एक मोटार पंप चोरी केल्याचे सांगीतल्याने सदर आरोपीकडून एकून ०४ मोटारपंप हस्तगत करण्यात आले आहे.



सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक मुम्मका सुदर्शन सा., अप्पर पोलीस अधिक्षक ईश्वर कातकडे उपविभागीय पोलीस अधिकारी, ब्रम्हपुरी दारासिंग राजपूत , पोलीस निरीक्षक प्रमोद बानबले यांचे मार्गर्शनाखाली ब्रम्हपुरी पोलीस ठाणे येथील गुन्हे शोध पथक चे सहा. पोलीस निरीक्षक मनोज खडसे यांचे नेतृत्यामध्ये पोलीस हवालदार मुकेश गजबे, पोलीस अंमलदार वशिष्ट रंगारी, प्रविन भिवगडे, निलेश तुमसरे, इर्शाद खान व स्वप्नील पळसपगार यांनी केली.

## जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा

युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी
**चंद्रपूर दि.५ :** राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारामुळे चंद्रपूर जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना आधारभूत किंमत योजनेतर्गत धानाचे प्रलंबित चुकारे तातडीने मिळावेत, यासाठी आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री ना. छगनजी भुजबळ यांना पत्र लिहीले होते. तसेच अन्न व नागरी पुरवठा विभागाचे प्रधान सचिव अनिल डिगीकर यांच्याशी दूरध्वनीवरून सविस्तर चर्चा केली होती. त्यानुसार चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी धान खरेदीचे १०३ कोटी ८ लाख ६३ हजार ३६१ रुपये इतके चुकारे मंजूर करण्यात आले आहेत.आ. मुनगंटीवार यांनी केलेल्या मागणीची दखल घेत प्रधान सचिवांनी फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात धानाच्या चुकाऱ्याची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होईल, असे आश्वासन दिले होते.

## नवनिर्वाचित शेतकरी संघटनाप्रणित आघाडीच्या उमेदवारांचा सत्कार समारंभ


युवाराष्ट्र दर्शन/तालुका प्रतिनिधी
**राजुरा दि.५ :** राजुरा नगर परिषद आणि कोरपना तालुक्यातील गडचांदूर नगर पंचायत च्या शेतकरी संघटना समर्थीत नगराध्यक्ष व नवनिर्वाचित नगरसेवक यांचा सत्कार आयोजित करण्यात आला आहे. या सत्कार सोहळ्याला शेतकरी संघटनेचे जेष्ठ नेते माजी आमदार ॲड. वामनराव चटप, स्वतंत्र भारत पक्षाचे प्रांताध्यक्ष मधुकर हरणे, शेतकरी संघटनेच्या माजी प्रांताध्यक्ष शैलाताई देशपांडे, माजी शेतकरी युवा आघाडी प्रांताध्यक्ष सतिश दाणी यांचेसह अनेक पदाधिकारी यावेळी प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत.कोरपना तालुक्यातील गडचांदूर नगर पलिकेच्या गडचांदूर नगर विकास आघाडीचे नगराध्यक्ष आणि सर्व नगरसेवक यांचा सत्कार दिनांक ६ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी १ वाजता कोरपना येथील भाऊराव पाटील चटप आश्रमशाळेत आयोजित करण्यात आला आहे. राजुरा येथे दिनांक ७ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी १ वाजता राजुरा येथील नगर विकास आघाडीतील शेतकरी संघटनेच्या कोट्यातून विजयी झालेले सर्व सभापती व सर्व नगरसेवक यांचा सत्कार साने गुरूजी सभागृहात आयोजित करण्यात आला आहे.

## नाईकनगरच्या चंद्रशेखर चा संशयास्पद मृत्यू ?

युवाराष्ट्र दर्शन/तालुका प्रतिनिधी
**राजुरा दि.५ :** येथील नाईकनगर निवासी चंद्रशेखर भिकाजी आडे हा ३० वर्षीय युवक भुरकुंडा ते रामनगर नर्सरीकडे जाणाऱ्या कच्चा मार्गावर मृतावस्थेत आढळून आला.चंद्रशेखर यांनी आत्महत्या केली की त्यांचा खून करण्यात आला हे समजू शकले नाही. तो एका सहकारी बँकेत वसुली अधिकारी म्हणून काम करीत होता.प्राप्त माहितीनुसार चंद्रशेखर हा वसुलीचे पैसे बँकेत जमा करण्यासाठी दुचाकी नंबर एम एच ३४-१५१९ वाहनाने राजुरा ला आला होता.रात्री घराकडे परत न आल्याने त्यांच्या घरवाल्यानी संपर्क केला असता मोबाईल बंद होता.मात्र सकाळी भुरकुंडा - रामनगर नर्सरी कडे जाणाऱ्या कच्चा मार्गावर चंद्रशेखर यांचा मृतदेह आढळून आला.त्याच्या नाका तोंडातून पांढरा फेस येत होता. घटनास्थळी मोबाईल, बॅग, हेल्मेट व पैसे गायब झाल्याचे दिसून आले.त्यांचा मृतदेह संशयास्पद रित्या आढळून आल्याने त्यांनी आत्महत्या केली की त्यांचा खून करण्यात आला हे समजू शकले नाही.वडील भिकाजी आडे यांच्या तक्रारी वरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



## डॉ.गोपाल मुंधडा यांचे निधन



युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी
**चंद्रपूर दि.५ :** चंद्रपूर बचाव संघर्ष समितीचे अध्यक्ष, प्रसिद्ध बालरोग तज्ज्ञ डॉ. गोपालजी मुंदडा यांचे गुरूवार दि. ५ फेब्रुवारी २०२६ रोजी पहाटे ५ वाजता हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने निधन झाले. मृत्यूसमयी ते ७८ वर्षाचे होते. सामाजिक क्षेत्रात नेहमी सक्रीय राहणारे, मनमिळाऊ स्वभावाचे व्यक्तीमत्व, अनेकांचे आधारस्तंभ नियतीने हिरावले आहे.सायंकाळी ५ वाजता शांतीधाम स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात आई, पत्नी, भाऊ, दोन मुले, सुना, नातवंडे व बराच मोठा आप्त परिवार आहे.

## घराणेशाहीला लगाम लावून तरुणांना संधी द्यावी - रविंद्र शिंदे

युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी
**चंद्रपूर दि.५ :** सहकार क्षेत्रात तरुणांचा सहभाग वाढवायचा असेल तर सहकार क्षेत्रातील कुटुंबाची मक्तदारी मोडीत काढणे आवश्यक आहे. सहकारात शिक्षेची कार्यवाही कडक असावी आणि कायदयातील पळवाटा कायमच्या बंद झाल्या पाहिजे. नवीन सहकार धोणात कर्ज माफीचे मुद्दे ठोस असले पाहिजे. मी पुस्तक वाचून नाही तर सहकार क्षेत्रातील अनुभवाने बोलतो.सहकार क्षेत्राच्या प्रगतीसाठी घराणेशाहीला लगाम लावून तरुणांना संधी द्यावी असे प्रतिपादन चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष रविंद्र श्रीनिवासराव शिंदे यांनी नवीन सहकार धोरण चर्चा सत्रात केले.
केंद्र आणि राज्य शासनाच्या बदलत्या सहकार धोरणाच्या पार्श्वभूमीवर सहकार भारती चंद्रपूर, चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने बँकेच्या प्रमुख कार्यालयातील मा.सा.कन्नमवार सभागृहात नवीन सहकार धोरण चर्चा सत्र दि.०५.०२.२०२६ रोजी आयोजित केले होते. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष बँकेचे अध्यक्ष रविंद्र श्रीनिवासराव शिंदे हे होते तर कार्यक्रमाचे उद्घाटन भारतीय रिझर्व्ह बँक व नाबार्ड चे संचालक मा.सतिशजी मराठे यांच्या हस्ते झाले. त्यांनी सहकार क्षेत्र प्रगतीकडे नेण्याच्या दृष्टीकोनातून सविस्तर मार्गदर्शन केले.



महामंत्री सहकार भारती,महाराष्ट्र प्रदेश समिती सदस्य मा.विवेकजी जुगाडे यांनी सहकार धोरणाविषयी माहिती दिली.या कार्यक्रमाला बँकेचे संचालक रोहीत बोम्मवार, संचालक यशवंतराव दिघोर, सहकार भारती नागपूर विभाग सह प्रमुख विजयजी गोटे,जिल्हा विशेष लेखापरिक्षक सहकारी संस्था,चंद्रपुरचे एस.एस.बनसोड, चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश्वर भि.
कल्याणकर, चंद्रपूर जिल्हा देखरेख सहकारी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गणेश काळे, सहकार भारती चंद्रपुरचे अध्यक्ष सतीश वासमवार, महामंत्री सौ.पुष्पा गोते.शेवटी सहकार धोरण व कायदयातील बदल यासंबंधाने प्रश्न उत्तर चर्चा करण्यात आली.


महाराष्ट्र शासन

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, मुल रोड, चंद्रपूर**

E-Mail - chandrapur2.ee@mahapwd.gov.in    दुरध्वनी क्र.०७१७२-२५२२५६

**ई-निविदा सुचना क्र. ६३ सन २०२५-२६**

कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, चंद्रपूर हे खालील कामांकरीता **महाराष्ट्र राज्यात योग्य त्या वर्गातील नोंदणिकृत कंत्राटदारांकडुन ब-१ प्रपत्रामध्ये ई-निविदा आमंत्रित करीत आहे.**

| अ.क्र. | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत (अंकात रूपये) | कामाची अंदाजित किंमत (अक्षरात रूपये) |
|---|---|---|---|
| १ | Restoration of Boys Hostel Building at ITI, Mul, Tah.Mul, Dist.Chandrapur | ६१५७८६३.०० | रूपये एकसष्ठ लाख सत्तावन्न हजार आठशे त्रेसष्ठ |

| | |
|---|---|
| ई-निविदा उपलब्ध कालावधी | ऑनलाईन वेळापत्रकानुसार |

खालील संकेतस्थळावर / सुचना फलकावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.

१. http://mahatenders.gov.in
(या नंतर सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वृत्तपत्रीय शुध्दीपत्रक न देता वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल. **तसेच ऑनलाईन वेळापत्रक अंतीम व लागु राहील.**)
२. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, चंद्रपूर कार्यालयातील सूचना फलक.
३. पत्रव्यवहाराकरीता संपर्क व पत्ता ::
**कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, मुल रोड, चंद्रपूर**
**दुरध्वनी क्रमांक ०७१७२-२५२२५६ E-mail - chandrapur2.ee@mahapwd.gov.in**

टिप -
१. सर्व पात्र / ईच्छुक निविदाकारांनी निविदाप्रपत्र डाउनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घण्यासाठी ई-निविदा प्रणालीच्या http://mahatenders.gov.in या Portal वर Enrollment करणे बंधनकारक आहे.
२. The information of E-Payment Gateway is available on E-Tendering website http://mahatenders.gov.in
३. सदर कामाच्या करारनाम्यात पोस्ट क्वॉलिफीकेशनचा क्रायटेरीया समाविष्ट केलेला आहे.

जावक क्रमांक ४३३ का. ३ (२)/निविदा/२०२५-२६ दिनांक ०५/०२/२०२६
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२.
मुल रोड, चंद्रपुर

कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. २
चंद्रपूर

क्र. संमावज/नाग/९२१/२०२६

## महाजन कॉलेज ऑफ टेक्नॉलॉजी येथे कर्करोग जागृती

•युवाराष्ट्र दर्शन यवतमाळ

येथील महाजन कॉलेज ऑफ टेक्नॉलॉजी व महाजन कॉलेज ऑफ नर्सिंग यांच्या संयुक्त विद्यमाने कर्करोग या विषयी विद्यार्थ्यांना जागृत करण्याकरिता कार्यक्रम घेण्यात आला. जागतिक कर्करोग दिनाचे औचित्य साधून यवतमाळ शहरातील सुप्रसिद्ध डॉ. सारिका शहा आणि डॉ. शेखर बंड यांचे मार्गदर्शन लाभले यावेळी डॉ. सारिका शहा यांनी उपस्थितांना कर्करोगाचे विविध प्रकार, कारण व त्याविषयी वेळोवेळी घेण्यात येणाऱ्या काळजी या विषयी मार्गदर्शन अत्यंत सोप्या भाषेमध्ये केले. याप्रसंगी मंचावर संस्थेचे संस्थापक सचिव सदाशिवराव महाजन, उपाध्यक्ष सौ सुजाता जिद्दवार, संचालिका सौ योगिता मंचलवार ,प्राचार्य आशिष होरे व नर्सिंग चे प्राचार्य शितल ढोके यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचालक प्राध्यापक साक्षी मिर्झापुरे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्राचार्य शितल ढोके यांनी केले यावेळी प्रा.ओम पाळेकर , प्रा. प्रज्वल गोरे, प्रा .सुहास चौधरी सर्व प्राध्यापक, कर्मचारी तथा विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

युवाराष्ट्र दर्शन
-: कार्यालयीन पत्ता :-
गुरूमाऊली सोसायटी, दाते कॉलेज रोड, जुना उमरसरा, यवतमाळ ४४५००१
-: जिल्हा प्रतिनिधी :-
संजय सावरकर मो. ९४२१८४४८७०
* एजन्सीसाठी संपर्क
ई-मेल ssawarkar43@gmail.com

# सरपंच पती व सदस्य पतीमध्ये बाचाबाची

## निकृष्ट कामाविरुद्ध तक्रार केल्याच्या कारणावरून भरचौकात जीवे मारण्याची धमकी

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी,
महागाव, दि. ५ फेब्रुवारी

तालुक्यातील काळी (दौ.) येथे ग्रामपंचायतीच्या कारभारावरून निर्माण झालेला वाद आता थेट जीवे मारण्याच्या धमकीपर्यंत पोहोचला असून, सरपंच पतीच्या या दबंगशाहीमुळे परिसरात प्रचंड खळबळ उडाली आहे. गावात सुरू असलेल्या बोगस आणि निकृष्ट दर्जाच्या कामांविरुद्ध आवाज उठवल्याचा राग मनात धरून, सरपंच निशा संतोष राठोड यांच्या पतीने सुनील टेमकर यांच्यावर लाकूड घेऊन हल्ला करण्याचा प्रयत्न केला आणि त्यांना भरचौकात जीवे मारण्याची धमकी दिली. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड प्रमाणात व्हायरल झाला आहे. विशेष म्हणजे, सुनील टेमकर यांच्या पत्नी स्वतः ग्रामपंचायत सदस्या आहेत, तरीही त्यांच्या कुटुंबावर झालेल्या या हल्ल्याच्या प्रयत्नामुळे लोकप्रतिनिधींच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

काळी (दौ.) ग्रामपंचायतीच्या माध्यमातून गावात विविध विकासकामे राबवली जात आहेत. मात्र, ही कामे तांत्रिकदृष्ट्या बोगस असून त्यात मोठा भ्रष्टाचार होत असल्याचा आरोप सुनील टेमकर यांनी केला होता. आपल्या भ्रष्टाचाराचा पोलखोल होत असल्याचे पाहून संतापलेल्या सरपंच पती संतोष राठोड यांनी काम चालू असलेल्या ठिकाणी टेमकर यांना अडवून यावेळी त्यांनी हातात लाकूड घेऊन त्यांच्या अंगावर धावून जात दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला. "जर पुन्हा कामात ढवळाढवळ केली किंवा तक्रार केली, तर जिवंत सोडणार नाही," अशा शब्दांत त्यांनी टेमकर यांना धमकी दिली. या संपूर्ण घटनेचा व्हिडिओ सोशल व्हायरल झाला असुन लोकशाही मार्गाने भ्रष्टाचाराचा विरोध करणाऱ्या नागरिकाचा आवाज अशा प्रकारे हिंसक मार्गाने दाबण्याचा प्रयत्न होत असल्याने ग्रामस्थांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

एकीकडे शासन पारदर्शक कारभाराचे दावे करत असतांना, दुसरीकडे सरपंचांचे पतीच प्रशासकीय कामात हस्तक्षेप करून तक्रारदारांना धमकावत आहेत. या प्रकारामुळे महागाव तालुक्यातील राजकीय वातावरण तापले असून, या 'सरपंच पती'वर पोलीस प्रशासन आणि वरिष्ठ अधिकारी काय कारवाई करतात, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

### थेट रक्कमच वाटून द्यावी

काळी ग्राम पंचायत मध्ये विविध योजनांतर्गत कोट्यवधी रुपयांची विकास कामे करण्यात आली.परंतु सदर कामे डमी कंत्राटदार उभे करून सरपंच पती स्वतःच करीत असल्याने कामाचा दर्जा व गुणवत्ता नावालाही नाही.त्यामुळे आम्ही अनेक वेळा संबंधित कामाबद्दल तक्रारी केल्या परंतु प्रशासनाने यावर कारवाई करण्याऐवजी उलट भ्रष्टाचाराची पाठराखण केली आहे.त्यामुळे गटविकास अधिकाऱ्यांनी कामाचा दिखावा करून बोगस कामे करून घेण्याऐवजी संबंधित कामाचा निधी टक्केवारीच्या हिशोबाने वाटून द्यावा.

:- सुनिल टेमकर(गावकरी काळी(दौ.)

### बदनामी करण्यासाठी खोट्या तक्रारी

संबंधित ग्राम पंचायत सदस्यांचे पती आपल्या पत्नीला सरपंच करता आले नाही याचा राग धरून मागील पाच वर्षांपासून गावातील विविध विकास कामांच्या तसेच आपल्या विरोधात षडयंत्र रचुन बदनामी करण्याच्या हेतुने खोट्या तक्रारी करीत आहेत.त्यांच्या सर्व तक्रारी प्रशासनाने निकाली काढून खारीज केल्या आहेत.परंतु आपल्यावरील रागापोटी त्यांचा कामे अडविण्याचा व खोट्या तक्रारी करण्याचा उपटसुंभाचा खेळ थांबण्याचे नाव घेत नाही आहे.

:- सौ.निशा संतोष राठोड(सरपंच काळी (दौ)

# आ. बाळासाहेब मांगुळकर यांनी वेधले लक्ष

## जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत गाजल्या शहरातील समस्या

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी,
यवतमाळ, दि. ५ फेब्रुवारी

शहरातील नाट्यगृहाचे बांधकाम ब-याच वर्षांपासून सुरू आहे. परंतु अजूनपर्यंत ते पूर्णत्वास गेलेले नाही, निधी कमी पडत असल्याने दि. 05 फेब्रुवारी रोजी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत त्याकरिता निधीची तरतूद करून बांधकाम पूर्ण करण्यात यावे आणि नामपूर्ण करून रसिकांच्या सेवेत सुपूर्द करण्याची मागणी आमदार बाळासाहेब मांगुळकर यांनी केली.

यवतमाळ नागपुर राज्य मार्गावरील जवाहर नगर, भारी बस स्टॉपवर राज्यमार्गावरील भरधाव वाहने चालतात, तसेच भारी जवाहर नगर कडून येणा-या वाहन धारकांना रस्त्यावर अंधार असतो त्यामुळे समोरुन येणारी वाहने दिसून येत नाही यामुळे त्याठिकाणी 6 ते 7 अपघात झाले असून त्यांची नोंद पोलीस दप्तरी आहे, तेव्हा याठिकाणी उड्डाण पूल बांधकाम करण्याची मागणी करण्यात आली. तसेच पुलाचे बांधकाम पूर्ण होईपर्यंत तात्पुरती व्यवस्था म्हणून येथे हायमास्ट युनिट उभारण्याची मागणी करण्यात आली.

यवतमाळ शहरात वाहनांची संख्या दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे तसेच वाहनधारक भरधाव वाहने चालवितात, त्यामुळे गर्दी होण्याची शक्यता असल्यामुळे सिग्नलची अत्यंत आवश्यकता आहे.

शारदा चौक, शनी मंदिर चौक, दर्डानगर चौक, लोहारा चौक, तहसील चौक या ठिकाणी सिग्नल बसविण्याची तरतूद करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल येथे अद्यावत मशनरीज उपलब्ध असून ती हाताळण्यासाठी कुशल कर्मचारी नसल्यामुळे त्या धूळखात पडलेल्या आहेत रुग्णांना परिपूर्ण उपचार वेळेवर मिळावे यासाठी नियमित कर्मचारी पदभरती करावी, तसेच यवतमाळ येथील भारी विमानतळाची अत्यंत दुरावस्था झालेली आहे. येथे कोणत्याही सुविधा नाहीत. प्रामुख्याने धावपट्टी वाढविणे आवश्यक आहे. प्रमूख सुविधा उपलब्ध करण्यात आल्यास येथे नियमीत सेवा सुरू करणे सोईचे होईल. त्याविषयी आजच्या सभेत चर्चा करून विमानतळाची धावपट्टीत वाढ करणे तथा अनुषंगीक सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी, यवतमाळ नगर परिषद येथे घंटागाडीची समस्या आहे. प्रत्येक वॉर्डात घंटागाडी नियमीत व पुरेशी सेवा देत नसल्यामुळे शहरात कचरा साचला आहे. कचरा संकलन करण्याचे काम व्यवस्थित होत नाही. यासाठी घंटागाडींची संख्या वाढविणे आवश्यक आहे. प्रत्येक वार्डात किमान 10 घंटागाड्या कार्यरत असायला पाहीजे, शहरातील गेडाम नगरमधील साई रेसीडेंन्सीपासून या भागात जो नाला आहे आतापर्यंत या नाल्यामध्ये पुरेसे पाणी वाहून जाण्याची क्षमता नसल्याने दोन व्यक्तींचा मृत्यू झाला आहे, नाल्याच्या दोन्ही बाजू उंच करून रुंदी वाढवून देण्यात यावी, तसेच रस्त्याचेही रुंदीकरण करण्यात यावे, अशा विविध मागण्या आमदार बाळासाहेब मांगुळकर यांनी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत केल्या.

### संक्षिप्त

#### कुऱ्हाड फाट्यावर पकडली रेतीचोरी

•युवाराष्ट्र दर्शन यवतमाळ : रेतीची चोरी करून नेताना आर्णी पोलिसांनी दोघांना पकडले. ही कारवाई ३ फेब्रुवारीला सायंकाळी आर्णी तालुक्यातील कुऱ्हाड फाटा येथे करण्यात आली. या प्रकरणी पोलिस कर्मचारी योगेश गिरी यांच्या फिर्यादीवरून मुंतजी चांदखा खान (४३) रा. राणीधानोरा आणि सोनू राऊत (३६) रा. आंबोडा ता. आर्णी या दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांच्याकडून रेतीचोरीसाठी वापरलेले वाहन (एमएच २९ टी १२४५) आणि तीन ब्रास रेती असा एकंदर ५ लाख १८ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

# बाबा कंबलपोष यांच्या वरील अतूट श्रद्धा

## कारंजा वरून नगरसेवक सायकलने पोहचले दर्शनाला



•युवाराष्ट्र दर्शन तालुका प्रतिनिधी
आर्णी, दि. ५ फेब्रुवारी

अतूट श्रद्धा व भक्तीने कारंजा येथील नगरसेवक नियमित ४ वर्षांपासून सायकलने बाबा कंबलपोश दरगाह येथे प्रार्थना व दर्शनास येतात. कारंजा नगरसेवक इर्शाद अली पैलवान यांचा सायकल प्रवासातून बाबा कंबलपोष दर्गा दर्शन हिंदू-मुस्लिम एकतेचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या आर्णी शहरातील बाबा कंबलपोष दर्गा शरीफ येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही कारंजा येथील नगरसेवक इर्शाद अली पैलवान यांनी सायकलने प्रवास करून ऊर्स निमित्त ५ फेब्रुवारी रोजी दर्शन घेतले.कारंजा ते आर्णी असा सायकल प्रवास करत आज ते आर्णी येथे पोहोचले असता बाबा कंबलपोष दर्गा कमिटीचे सचिव रियाज बेग यांनी नगरसेवक इर्शाद अली पैलवान यांचा शाल देऊन सत्कार करून स्वागत केले.यावेळी सामाजिक कार्यकर्ते जानी सोलंकी, नगरसेवक अशपाक शेख, पत्रकार परवेज बेग, मनोज माघाडे, फैजान शेख, शाहेब खा. यामुद्दिन नवाब, शाहिद मलनस, रफिक शेख तसेच दर्गा कमिटीचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अर्थसंकल्प देशाला दिशा देणारा : मिलींद कानडे




•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी,
यवतमाळ, दि. ५ फेब्रुवारी

केंद्र सरकारने सादर केलेला २०२६-२७ चा अर्थसंकल्प हा आर्थिक सशक्तीकरण, शेतकरी, मध्यमवर्ग, युवक आणि उद्योग क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण व दिशादर्शक ठरणारा आहे, अशी माहिती सीए मिलींद कानडे यांनी बुधवारी (ता.४) आयोजित पत्रपरिषदेत दिली.

पुढे बोलतांना मिलींद कानडे म्हणाले की, अर्थसंकल्पात युवक, शेतकरी, महिला, मध्यमवर्ग, स्टार्टअप्स, लघुउद्योग, पायाभूत सुविधा, आरोग्य, शिक्षण आणि ग्रामीण विकासाला प्राधान्य देण्यात आले आहे. १२ लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न करमुत करण्याचा निर्णय हा मध्यमवर्गीय करदात्यांना मोठा दिलासा देणारा आहे. पंतप्रधान धनधान्य योजनेअंतर्गत १.७ कोटी शेतकऱ्यांना थेट लाभ मिळणार असून डाळी व तेलबियांच्या उत्पादनात देश आत्मनिर्भर होण्याच्या दिशेने ठोस पावले उचलली आहेत. तसेच किसान क्रेडिट कार्डद्वारे ५ लाख रुपयांपर्यंत कर्ज सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्णय शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थैर्यासाठी उपयुत ठरणार आहे.

खाजगी क्षेत्रातील संशोधन संस्थांसाठी २० हजार कोटी रुपयांची तरतूद आणि देशभरात ५० हजार अटल टिंकरिंग लॅब्स उभारण्याचा निर्णय हा नवोन्मेष, संशोधन आणि युवकांच्या कौशल्यविकासाला चालना देणारा आहे. विमा क्षेत्रातील थेट परकीय गुंतवणूक मर्यादा १०० टक्यांपर्यंत वाढवण्याचा निर्णय गुंतवणूक वाढ, रोजगारनिर्मिती आणि आर्थिक विस्तारासाठी अत्यंत सकारात्मक ठरेल. एकूणच, हा अर्थसंकल्प विकसित भारत या संकल्पनेला बळ देणारा आहे. राज्यात २० नवीन जलमार्ग तसेच पर्यावरणपूरक कॉरीडोर तयार करण्यात येणार आहे. १७ औषधांवर सूट देण्यात आली आहे. पशुपालकांना प्रोत्साहन देण्यासाठीही योजना असून उत्पन्न वाढविण्यासाठी मत्स्य व्यवसायाला चालना देण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी मिलींद कानडे म्हणाले की, मध्यमवर्गियांना केंद्रस्थानी ठेवून अर्थसंकल्प तयार करण्यात आला. शैक्षणिक, रक्षा, ग्रामीण विकास, दूरसंचार क्षेत्र, शहरी विकास, आयटी, विदेशी कार्य या सर्वांना प्राधान्य देण्यात आले असून रक्षा क्षेत्रासाठी सर्वात जास्त बजेटमध्ये तरतूद करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. मध्यमवर्गाला दिलासा, उद्योजकांना संधी आणि युवकांना भविष्याची दिशा देणारा हा अर्थसंकल्प आहे. या अर्थसंकल्पाच्या प्रचार-प्रसारासाठी जिल्ह्यात अभियान राबविण्यात येणार असून समिती स्थापन करणार असल्याचे त्यांनी सांगितले. पत्रकार परिषदेला सीए मिलींद कानडे, आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके, भाजपा जिल्हाध्यक्ष ॲड. प्रफुल्ल चौहाण, राजू पडगीलवार, रेखाताई कोठेकर, पंकज नानवाणी, शंतनु शेटे, आकाश धुरट, अमोल देशमुख आदींची उपस्थिती होती.

# मानकी येथे भव्य कबड्डी स्पर्धेचे खुले सामन्यांचे आयोजन

•युवाराष्ट्र दर्शन वणी|
प्रतिनिधी दि. ५ फेब्रुवारी

जय गुरुदेव क्रीडा मंडळ, मानकी यांच्या वतीने भव्य कबड्डी स्पर्धेचे खुले सामने दिनांक ५ व ६ फेब्रुवारी रोजी मानकी येथील खुल्या पटांगणात आयोजित करण्यात आले आहेत. या स्पर्धेचा उद्घाटन सोहळा गुरुवारी सायंकाळी ६ वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटक माजी आमदार संजिवरेड्डी बोदकुरवार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वसंत जिनिंगचे अध्यक्ष प्रमोद वासेकर राहणार आहेत.



तर प्रमुख अतिथी म्हणून नायब तहसीलदार रामचंद्र खिरेकर, मुंबई पनन महासंघाचे संचालक संजय खाडे, शंकरराव वऱ्हाटे, पुरुषोत्तम आवारी, दिनकर पावडे, संजय पिंपळशेंडे, माजी सभापती पं. स. वणी, नितिन वासेकर, संतोष डंभारे, मंगलाताई पावडे,सौ. मेघा वासेकर संचालिका धन्वंतरी फाउंडेशन, प्रविण झाडे अध्यक्ष सरपंच संघटना वणी, तुकाराम माथनकर जिल्हाध्यक्ष सरपंच संघटना, कैलास पिपराडे सरपंच, मानकी, शंकर माहुरे उपसरपंच, मानकी, सौ. मिनाक्षीताई मिलमिले पोलीस पाटील मानकी, किशोर नागपुरे अध्यक्ष शाळा समिती, मुख्याध्यापक आनंद पाटील, कुणाल वासेकर, साई लॅपटॉप ओनर, ॲड. प्रविण पुरी विशेष सहाय्यक सरकारी वकील, तुळशीदास नागपुरे सोसायटी अध्यक्ष, विजय काकडे अध्यक्ष, तंटामुक्ती, सुनील कुत्तरमारे अध्यक्ष जय गुरुदेव क्रीडा मंडळ व परशुराम पोटे (पत्रकार) आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या उद्घाटन सोहळ्यासह कबड्डी सामन्यांचा आनंद घेण्यासाठी नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# महाविस्तार ॲप शेतकऱ्यांचा डिजिटल मित्र

•युवाराष्ट्र दर्शन तालुका प्रतिनिधी
दिग्रस, दि. ५ फेब्रुवारी

महाराष्ट्रातील प्रत्येक शेतकऱ्यास शास्त्रशुद्ध आणि कृषिविषयक पीक लागवड,खत व्यवस्थापन,कीड व्यवस्थापन, हवामान अंदाज, बाजार भाव याविषयक सल्ला देऊन सक्षम करणे ही महाविस्तार मागील संकल्पना आहे. हा महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाने विकसित केलेला प्लॅटफॉर्म आहे आणि त्यावर हवामान, माती, मंडई तसेच शासकीय योजना यांची माहिती एकत्रितपणे उपलब्ध आहे. मराठी तसेच इंग्रजी भाषेतील चॅटबॉटमार्फत शेतकऱ्यांना स्थानिक आणि त्यांच्या गरजेनुसार



सल्ला अत्यंत सहज मिळू शकतो. क्लिष्ट माहिती आणि शेतीतील व्यवहार्य निर्णय यातील दरी दूर करण्याचे काम महाविस्तार करते. महाविस्तार हे शाश्वत शेती, डिजिटल सक्षमीकरण आणि समृद्ध गावे यादिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे यावाबत तालुका कृषी अधिकारी शांतीराम धनुर्डे यांच्या आदेशाने सहाय्यक कृषी अधिकारी आशिष पाटेकर, सचिन शिंदे यांनी या बाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करून ॲप डाउनलोड करुन देऊन मार्गदर्शन केले

# वडिलांचा खून करून प्रेत बंधाऱ्यात फेकले

•युवाराष्ट्र दर्शन ढाणकी|
प्रतिनिधी दि. ५ फेब्रुवारी

पैनगंगा नदीवरील सहस्त्रकुंड बंधाऱ्यात ताडपत्रीत गुंडाळलेल्या अवस्थेत आढळलेल्या त्या अज्ञात मृतदेहाचे गूढ अखेर उकलले आहे. स्वतःच्या मुलानेच आईच्या मदतीने वडिलांचा खून करून पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह बंधाऱ्यात फेकला होता. बिटरगाव पोलिसांनी तांत्रिक तपास आणि शिलाई मशीनच्या एका लेबलवरून या गुन्ह्याचा छडा लावला आहे.

सहस्त्रकुंड बंधाऱ्यात ९ जानेवारी २०२६ रोजी एक कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळला होता. मृतदेहाची ओळख पटवणे पोलिसांसमोर मोठे आव्हान होते. यवतमाळ पोलीस अधीक्षकांनी या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून तपासासाठी चार पथके तैनात केली होती.



तपासादरम्यान हिंगोली, नांदेड आणि तेलंगणा सीमावर्ती भागातील पोलीस पाटलांशी संपर्क साधण्यात आला. यावेळी जलदरा (ता. किनवट) येथील पोलीस पाटील सुरेश वाघमारे यांनी मारोती गंगाराम डुकरे (६०) हे बेपत्ता असल्याची माहिती दिली. पोलिसांनी संशयावरून मृताचा मुलगा प्रदीप मारोती डुकरे (२५) आणि पत्नी पार्वताबाई मारोती डुकरे यांची चौकशी केली असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली.

पोलिसांनी संशयिताच्या घराची झ डती घेतली असता, मृतकाच्या क पड्यांवर आणि घरातील इतर कपड्यांवर "City Mens Tailor" चे सारखेच शिलाई लेबल आढळले. या तांत्रिक पुराव्यामुळे संशय बळावला आणि पोलिसांनी पोलिसी खाक्या दाखवताच आरोपी प्रदीपने वडिलांची हत्या केल्याची कबुली दिली.

बिटरगाव पोलीस स्टेशनमध्ये अपराध क्र. ०२/२०२६, भारतीय न्याय संहिता (BNS) कलम १०३ (खून) आणि २३८ (पुरावा नष्ट करणे) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन्ही आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून पुढील तपास पोलीस प्रशासन करत आहे.

खून करून कोणताही पुरावा सोडला नसल्याने त्यात मृतकाची ओळख पटत नसल्याने तपास करणे आवघड होते.

# आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्या 'त्या' गायिकेला बेड्या ठोका

## अमृता फडणवीसांवरील टीकेने पुसदमध्ये संताप

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी,
पुसद, दि. ५ फेब्रुवारी

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांच्याविषयी अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्या गायिका अंजली भारती यांच्याविरोधात पुसदमध्ये संतापाचा उद्रेक झाला आहे. एक महिला असूनही दुसऱ्या महिलेबद्दल इतक्या अश्लाघ्य भाषेत बोलणे हे विकृतीचे लक्षण आहे. अशा शब्दांत 'संवाद आपल्यांचा' या सामाजिक संघटनेने आपला संताप व्यक्त केला आहे. या संघटनेच्या वतीने उपविभागीय दंडाधिकारी आणि पुसद शहर पोलिसांना निवेदन देऊन अंजली भारतींवर तात्काळ गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्याची मागणी करण्यात आली. यावेळी पत्रकारांशी बोलतांना संघटनेचे शाम जोशी यांनी अंजली भारती यांच्यावर घणाघाती टीका केली. ते म्हणाले स्वतःला शाहू-फुले-आंबेडकरांची गायिका म्हणवून घेणाऱ्या आणि स्वतःवर आंबेडकरी विचारांचे संस्कार असल्याचे सांगणाऱ्या या बाईला महापुरुषांचे विचार समजलेच नाहीत अन्यथा ती असे बोललीच नसती. हे निव्वळ अकलेचे दिवाळे निघाल्याचे लक्षण आहे. अशा बाईवर कडक कारवाई झालीच पाहिजे. यावेळी महिलांच्या भावना अत्यंत तीव्र होत्या. सौ. सीमा पापीनवार यांनी संताप व्यक्त करताना म्हटले की जर राज्याच्या मुख्यमंत्र्यांच्या पत्नीबद्दल कोणी इतक्या घाणेरड्या शब्दात बोलण्याची हिंमत करत असेल तर सामान्य महिलांच्या सुरक्षेची काय हमी? समाजात गरळ ओकणाऱ्या अशा विषारी वृत्तीला वेळीच कायद्याचा बडगा दाखवून ठेचले पाहिजे. तर रूपाली जयस्वाल यांनी एका



महिलेनेच दुसऱ्या महिलेची अशी बदनामी करणे धक्कादायक आणि लज्जास्पद आहे, असे म्हणत कठोर शिक्षेची मागणी केली. उपविभागीय दंडाधिकाऱ्यांना निवेदन दिल्यानंतर शिष्टमंडळाने पुसद शहर ठाण्याचे ठाणेदार वानखेडे यांची भेट घेतली. यावेळी कैलास गावणार यांनी घटनेचे गांभीर्य विषद करत अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी पोलिसांत तक्रार दाखल करण्याची मागणी केली. यावेळी रुपाली जयस्वाल, सीमा पापीनवार, अरुणा जाधव, शीतल उतळे, श्वेता डंबोळे, अश्विनी जिल्हेवार, ॲड. अंबिका काळे, प्रसन्ना बुब, आशा नालंदे, प्रीती गवरशेट्टीवार, शाम जोशी, महेश काळे, कैलास गावणार, पांडुरंग उतळे, सुरज कुरील, विक्रांत जिल्हेवार, राहुल कुरील, सुरेश तिवारी, प्रशांत डंबोळे, सागर नरसिंग, डॉ. सुरज चौधरी, राजू महाजन, रमेश सोमाणी, अर्चनाताई, वैभव उबाळे यांच्यासह पुसदकर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**CHANGE OF NAME**

Old Name - **Mohd Rafique A. Kadar**
New Name in Documents -
**Mohammad Rafique Abdul Kadar**
I will hereafter use my New Name as
**Mohammad Rafique Abdul Kadar** in all my transactions and deeds.
Address - At.Po. Jam Bazar, Tah Pusad, Dist Yavatmal -445201

**CHANGE OF NAME**

Old Name-**Mohd Aslam Mohd Rafique** in old Passport No K5427776 New Name in Documents - **Mohammad Aslam Mohammad Rafique.** I will hereafter use my New Name as **Mohammad Aslam Mohammad Rafique** in all my transactions and deeds.
Address: At.Po. Zam Bazar Tah Pusad Dist Yavatmal -445204

# ३५ वर्षांनी जमिनीवर!



जगभरात अनेक रहस्यमय आणि अंगावर काटा आणणाऱ्या कथा बघायला मिळत आहेत. त्यात काही कथा विज्ञानाच्या पलीकडच्या आहेत, तर काही मानवी कल्पनाशक्तीला आव्हान देणाऱ्या आहेत. सँटियानो फ्लाइट ५१३ विमानाची कथा केवळ विमान अपघाताची नाही, तर वेळेच्या गूढाशी जोडलेली असल्याचे मानले जाते.

मिळालेल्या माहितीनुसार, सँटियानो फ्लाइट ५१३ हे विमान १९५४ साली दक्षिण अमेरिकेतील सँटियागो येथून उड्डाण घेऊन ब्राझीलमधील पोर्टो एलेग्रे येथे जाणार होते. साधारण १८ तासांचा प्रवास करून हे विमान आपल्या ठरलेल्या ठिकाणी पोहोचणे अपेक्षित होते; मात्र अटलांटिक महासागरावरून जात असताना हे विमान अचानक रडारवरून गायब झाले. विमानाचा कोणताही संपर्क न झाल्याने आणि कुठलाही अपघातस्थळाचा पुरावा न मिळाल्याने अधिकाऱ्यांनी हे विमान समुद्रात कोसळले असावे असा अंदाज लावला. हे विमान शोधण्यासाठी शोधमोहीम राबवण्यात आली; पण काहीही हाती लागले नाही. त्यानंतर अखेर हे प्रकरण बंद करण्यात आले; मात्र तब्बल ३५ वर्षांनंतर म्हणजेच १९८९ मध्ये सर्वांना धक्का बसला. हेच विमान अचानक ब्राझीलमधील पोर्टो एलेग्रे विमानतळावर उतरले. आश्चर्याची गोष्ट म्हणजे विमानाची रचना आणि क्रमांक हे १९५४ मधीलच होते.



# छत्तीसगडमध्ये सापडली रहस्यमयी गुहा


## कॅलिडोस्कोप

छत्तीसगडमध्ये भारतातील सर्वात रहस्यमयी गुहा सापडली आहे. या गुहेत हिरव्या रंगाचे चमकणारे दगड तरंगताना दिसत आहेत. या गुहेत संशोधन सुरू असून लवकरच ही गुहा पर्यटकांसाठी खुली होणार आहे. पर्यटन नकाशावर हिरव्या गुहेचा समावेश केल्याने कांगेर व्हॅली राष्ट्रीय उद्यानात पर्यटनाला एक नवीन आयाम मिळेल. स्थानिक रोजगाराच्या संधी वाढतील आणि प्रादेशिक विकासाला गती मिळेल.

या गुहेला हिरवी गुहा असे नाव देण्यात आले आहे. ही गुहा भारतातील सर्वात रहस्यमयी पर्टनस्थळ ठरणार आहे. छत्तीसगड मधील कांगेर व्हॅली राष्ट्रीय उद्यान हे त्याच्या अद्भुत नैसर्गिक सौंदर्यासाठी, समृद्ध जैवविविधतेसाठी आणि जगप्रसिद्ध पर्यटन स्थळांसाठी देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध आहे. वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले, की घनदाट जंगलांमध्ये वसलेली ही गुहा अद्वितीय रचनेमुळे आणि नैसर्गिक सौंदर्यामुळे एक नवीन पर्यटक आकर्षण बनू शकते. गुहेपर्यंत पोहोचण्याचा रस्ता कठीण आहे. हिरव्या गुहेकडे जाणारा मार्ग मोठ्या दगडांमधून जातो. गुहेत प्रवेश केल्यावर, सूक्ष्मजीवांच्या साठ्यांनी झाकलेल्या हिरव्या भिंती पर्यटकांना आकर्षित करतात. गुहेत प्रवेश केल्यावर एक मोठा कक्ष उघडतो. इथे चमकदार आणि भव्य स्टॅलेक्टाइट्स आणि फ्लोस्टोन (वाहत्या पाण्याने तयार झालेले दगडांचे थर) पहायला मिळतात. हे गुहेच्या नैसर्गिक वैभवात आणखी भर घालतात. कोटुमसर कॉम्प्लेक्सच्या कंपार्टमेंट क्रमांक ८५ मध्ये हिरवी गुहा आहे. गुहेच्या भिंती आणि छत हिरव्या सूक्ष्मजीवांनी भरलेले आहे. त्यामुळे या गुहेला 'हिरवी गुहा' असे नाव मिळाले आहे. चुनखडी आणि शेलपासून बनलेली ही गुहा कांगेर खोऱ्यातील सर्वात दुर्मिळ आणि अद्वितीय गुहांपैकी एक मानली जाते.

वन विभाग गुहेची सुरक्षा आणि नियमित देखरेख सुनिश्चित करत आहे. शिवाय, पर्यटकांच्या सोयीसाठी प्रवेश रस्ते, पदपथ आणि इतर आवश्यक पायाभूत सुविधांचा विकास सुरू आहे. कांगेर व्हॅली राष्ट्रीय उद्यानात पर्यटनाला चालना देण्यासाठी वन विभाग सतत प्रयत्न करत आहे.

# गायब झाली ट्रेन



जगात विश्वास बसू न शकणाऱ्या अनेक घटना घडल्या आहेत. अजूनही अनेक रहस्य उलगडलेली नाहीत. बर्म्युडा ट्रँगलमध्ये अनेक जहाजं आणि विमानं गायब झाली आहेत. अजूनही त्यांचा थांग लागलेला नाही. १९११ मध्ये अशीच एक घटना घडली होती. त्यात १०६ प्रवाशांना घेऊन जाणारी ट्रेन बोगद्यात शिरली खरी पण ती बाहेर आलीच नाही. आतल्या आत कुठेतरी गायब झाली. पुढे ट्रेनचं काय झालं हे अद्यापही कोणाला कळलेलं नाही. ही रोमांचकारी घटना रोममधली आहे. जेनेटी नावाची ही ट्रेन रोमन स्टेशनवरून निघाली. ट्रेनच्या मार्गात एक बोगदा होता. ट्रेन या बोगद्यात शिरली खरी पण बाहेर आलीच नाही. ट्रेनचा बराच शोध घेण्यात आला. पण ती कोणालाही सापडली नाही. घटनेनंतर ट्रेनमधले दोन प्रवासी बोगद्याबाहेर सापडले. त्यांनी सांगितलं ते ऐकून अनेकांना धक्काच बसला. ट्रेन बोगद्याजवळ येऊ लागल्यावर आतून धूर येऊ लागला. हा धूर अगदी विचित्र होता. तो बघून हे दोन प्रवासी खूप घाबरले आणि त्यांनी ट्रेनमधून उडी मारली. यानंतर ट्रेन बोगद्यात शिरली आणि गायब झाली. ही ट्रेन ७१ वर्ष मागे म्हणजे भूतकाळात गेली असल्याची चर्चा होती. ही सगळी भुताटकी असल्याचं काही लोक सांगतात. ही ट्रेन मेक्सिकोत १८४० च्या काळात पोहोचली असल्याचं बोललं जातं. मेक्सिकोतल्या एका रुग्णालयात १०४ लोकांना दाखल करण्यात आलं होतं. पण ते सगळे वेडे झाले होते, असं मेक्सिकोतल्या एका डॉक्टरने सांगितलं होतं. आपण ट्रेनने इथे आल्याचं त्यांचं म्हणणं होतं. पण रोमहून मेक्सिकोला जाणारी कोणतीही ट्रेन त्या काळात अस्तित्त्वात नव्हती. त्यामुळे या ट्रेनचं नेमकं काय झालं, हे कोणालाही माहीत नाही. हा प्रकार म्हणजे एक चमत्कारच म्हटला पाहिजे.

# हनुमान मंदिराला कुत्र्याच्या प्रदक्षिणा



उत्तर प्रदेशातील बिजनौर जिल्ह्यातील लोकांना नुकतेच श्रद्धेचे एक अनोखे दृष्य दिसले. नंदपूर गावातील एका प्राचीन हनुमान मंदिरात एक कुत्रा बजरंगबलीच्या मूर्तीला प्रदक्षिणा घालत होता. कुत्र्याची प्रदक्षिणा पाहण्यासाठी दूरदूरचे लोक जमत आहेत. गर्दी नियंत्रित करण्यासाठी पोलिस तैनात करण्यात आले आहेत.

स्थानिकांचे म्हणणे आहे, की कुत्रा तीन ते चार दिवसांपूर्वी पहाटे ४ वाजता मंदिर परिसरात आला आणि न थांबता हनुमानाच्या मूर्तीला प्रदक्षिणा घालू लागला. लोकांचे म्हणणे आहे, की परिक्रमेदरम्यान हा कुत्रा खात नाही किंवा पाणी पीत नाही. लोकांनी कुत्र्यासाठी जेवण आणि पाण्याची व्यवस्थाही केली; पण कुत्र्याने काहीही खाल्ले नाही आणि प्यायले नाही.

एक कबुतरदेखील कुत्र्यासोबत प्रदक्षिणा करत होते. लोक म्हणतात, की कबुतर कुत्र्याच्या वर बसून प्रदक्षिणा करत होता, परंतु कबुतराचा मृत्यू झाला, त्यानंतर कुत्र्याने त्याची प्रदक्षिणा थांबवली. या वेळी कुत्रा भावूकही झाला.



# ...म्हणून होतात मृत्यू

जगभरात अनेक धार्मिक स्थळं आहेत. त्या ठिकाणांशी संबंधित काही कथा आहेत. रहस्य आहेत. अशाच एका ठिकाणाला 'नरकाचा दरवाजा' म्हटलं जातं. मंदिरात गेलेला माणूस कधीच परत येत नाही. इथे गेलेल्या लोकांचा मृत्यू होतो. तो कशामुळे होतो याचा शोध लावण्यात आपल्याला यश आल्याचं संशोधकांचं म्हणणं आहे. दक्षिण तुर्कीतल्या हिरापोलीस शहरात अत्यंत प्राचीन असं एक मंदिर आहे. या ठिकाणी येणाऱ्या लोकांचा मृत्यू होतो. या मृत्यूंमागचं कारण कोणालाही माहीत नाही. त्यामुळे या मंदिराला नरकाचं द्वार असं म्हटलं जातं. इथे येणारे पशूपक्षीही मृत्यू पावत असत. युनानी देवतेच्या विषारी श्वासांमुळे माणसांचा तसंच पशूपक्ष्यांचा मृत्यू होत असल्याचं बोललं जात असे. पण अशाप्रकारे होणाऱ्या मृत्यूंमागे शास्त्रीय कारण असल्याचं संशोधकांचं म्हणणं आहे. मंदिराच्या मागच्या भागातून कार्बन डाय ऑक्साइड बाहेर पडत आहे. या भागात कार्बन डाय ऑक्साइडचं प्रमाण खूप जास्त असल्याचं संशोधकांचं म्हणणं आहे. पृथ्वीच्या गर्भातून विषारी वायू बाहेर पडत असल्याने इथे येणाऱ्या लोकांचा मृत्यू होत असावा. मंदिराच्या खालच्या बाजूच्या गुहेत कार्बन डाय ऑक्साइडचं प्रमाण खूप जास्त असल्याचं शास्त्रज्ञांना आढळून आलं आहे. या गुहेतून येणाऱ्या वाफेमुळे पशुपक्षी तसंच अन्य जीवांचा मृत्यू होतो. भरपूर बाष्प असल्यामुळे जमीनही नीट दिसत नाही. त्यामुळेही लोक फसतात आणि अपघात घडतात.

# जनावरांच्या गळी सोन्याच्या सरी

बऱ्याच घरांमध्ये पाळीव प्राण्यांचे खूप लाड होतात. लाडक्या कुत्र्याला किंवा मनीमाऊला छान छान कपडे घातले जातात. त्यांना पार्लरमध्ये नेलं जातं. प्राण्यांची काळजी घेण्यासाठी प्राणीप्रेमी बरंच काही करत असतात. प्राण्यांच्या रक्षणासाठी बरीच आंदोलनं होतात. पण अनंत सिंह नामक आमदार अनोखे आहेत. प्राण्यांवरील प्रेमापोटी ते त्यांना सोन्याने मढवतात. गायी-म्हशींच्या गळ्यात सोनसाखळ्या घालतात. सोनपूरमध्ये जगातल्या सर्वात मोठ्या पशूमेळ्याचं आयोजन केलं जातं. अनंत सिंह या मेळ्यात पोहोचले आहेत. ते बिहार विधानसभेतले आमदार असून भलतेच लोकप्रिय आहेत. मेळ्यात येणारे लोक अनंत सिंह यांच्या शिबिरात दाखल होतात. सिंह यांनी आपल्या शिबिरातल्या प्रत्येक जनावराच्या गळ्यात २०० ते २५० ग्रॅमची सोन्याची चेन घातली आहे. आमदारांच्या या शिबिरात तीन घोडे, एक हत्ती आणि काही गायी आहेत. सगळ्या जनावरांच्या गळ्यातल्या दागिन्यांचं वजन अडीच किलोच्या आसपास आहे. आजघडीला त्याची किंमत ७५ लाख रूपयांच्या घरात जाते. या जनावरांच्या खाण्यापिण्याची विशेष काळजी घेतली जाते. चाऱ्यासोबतच त्यांना ताजी फळं आणि दूध दिलं जातं. त्यांच्याकडील हत्ती दररोज २० किलो सफरचंद खातो. दिवसाला जवळपास ५० हजार रूपये पशूंच्या आहारावर खर्च केले जातात. त्यांच्या देखभालीसाठी ५० लोक तैनात आहेत.



# दरवाजा उघडताच उडाली होती खळबळ

विमान विमानतळावर उतरले आणि दरवाजा उघडला तेव्हा आतमधील दृश्य पाहून सर्वांनाच धक्का बसला. विमानातील सर्व प्रवासी आपापल्या सीटवर होते; मात्र त्यांचे फक्त सापळे तिथे होते. या विमानाचा पायलटदेखील त्याच्या जागेवर होता. या विमानामध्ये ना आग लागली ना कोणताही अपघात झाल्याची गोष्ट दिसून आली.

या घटनेनंतर जगभरात अनेक तर्क-वितर्क सुरू झाले. काहींनी ही घटना टाइम ट्रॅव्हलशी संबंधित असल्याचे म्हटले, तर काहींनी ही कथा पूर्णपणे अफवा असल्याचे म्हटले. आजपर्यंत या घटनेबाबत सरकारी किंवा विमान वाहतूक संस्थेकडून कोणताही अधिकृत ठोस पुरावा उपलब्ध झालेला नाही.





# समुद्राला न मिळणारी नदी!

लुनी ही नदी कधीही समुद्राला मिळत नाही. या नदीचा उगम राजस्थानमधील अजमेर जवळील अरवली पर्वतरांगांमधील 'नागा' टेकड्यांवर होतो. ती राजस्थानमधून वाहत गुजरातमध्ये प्रवेश करते.

ही नदी कोणत्याही समुद्राला मिळण्याऐवजी गुजरातच्या कच्छच्या रणात जाऊन लुप्त होते. कच्छचे रण हे एक दलदलीचे वाळवंट आहे, तिथे ही नदी स्वतःचे अस्तित्व संपवते. 'लुनी' हे नाव संस्कृत शब्द लवणवरी' (खारे पाणी) वरून आले आहे. उगमस्थानी हे पाणी गोड असते; पण बाडमेर जिल्ह्यातील बालोतरा येथे पोहोचल्यावर ते अत्यंत खारे बनते, कारण तेथील जमिनीतील क्षारांचे प्रमाण जास्त आहे.

ही एक हंगामी नदी आहे. पावसाळ्यात यात मोठ्या प्रमाणात पाणी असते; मात्र उन्हाळ्यात कोरड्या हवामानामुळे ती अनेक ठिकाणी आटते. वाळवंटी भागातील लोकांसाठी ही नदी जलसंजीवनी मानली जाते. राजस्थानच्या पश्चिम भागात शेती आणि पशुपालनासाठी या नदीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

# ... आणि त्याला पर्स मिळाली

पर्स चोरीला गेल्यास आपण खूप अस्वस्थ होतो. कारण पर्समध्ये रोख रकमेबरोबरच महत्त्वाची कागदपत्रं तसंच डेबिट, क्रेडिट कार्ड असतात. त्यांचा गैरवापर होऊ नये यासाठी धावपळ सुरू होते. पण हरवलेली पर्स व्यवस्थित परत मिळाली तर? इतकंच नाही तर पर्समध्ये आपल्याला जास्तीचे पैसेही मिळाले तर? आधीच पर्स मिळण्याची शक्यता कमी. मग त्यात जास्तीचे पैसे कोण देणार, हा प्रश्न तुमच्या मनात उपस्थित झाला असेल. पण ओहामाचा रहिवासी असणाऱ्या एका व्यक्तीच्या बाबतीत असं घडलं आहे. त्याचं झालं असं की, बहिणीच्या लग्नासाठी या व्यक्तीला लास वेगासला यायचं होतं. तो विमानाने लास वेगासला आला. हंटर शैमत्त असं या व्यक्तीचं नाव आहे. तो २० वर्षांचा आहे. खिसे तपासल्यानंतर आपली पर्स कुठेतरी हरवल्याचं त्याच्या लक्षात आलं. पर्समध्ये ६० डॉलर रोख, ४०० डॉलरचा चेक, बँक कार्ड आणि ओळखपत्र होतं. ओहामाहून वेगासला येताना विमानात पर्स विसरली असेल असं वाटून त्याने कंपनीला संपर्क केला. पर्स हरवल्यामुळे हंटरला बराच त्रास सहन करावा लागला. तो कसाबसा ओहामाला पोहोचला. पण घरी पोहोचल्यानंतर दोन दिवसांच्या आत त्याला पर्स परत मिळाली. पोस्टाने ती त्याच्यापर्यंत पोहोचली होती. इतकंच नाही तर पर्समध्ये ६० नाही तर १०० डॉलर होते. त्यात त्याला एक चिठ्ठीही सापडली. पर्स पाठवणाऱ्याने ही चिठ्ठी लिहिली होती. टोड ब्राउन नावाच्या इसमाने ही पर्स हंटरला परत दिली होती.



पर्स मिळाल्याचा आनंद साजरा करता यावा म्हणून टोडने त्यात थोडे जास्तीचे डॉलरही ठेवल होते. विमानात त्याला ही पर्स मिळाली होती. पर्स मिळाल्यामुळे हंटरला खूप आनंद झाला आहे.

# सांतानं भरलं बिल

तुम्ही एखाद्या शॉपिंग मॉलमध्ये गेला, भरपूर खरेदी केली आणि त्याचं बिल कोणी दुसऱ्यानेच भरलं तर... काय मज्जा येईल ना! अमेरिकेतल्या वॉलमार्टमध्ये खरेदी करणाऱ्या लोकांना नुकताच हा अनुभव आला. इथल्या डर्बी शहरातल्या वॉलमार्ट सुपरमार्केटमध्ये बरेच लोक खरेदीसाठी आले होते. त्याच वेळी एक घोषणा करण्यात आली. इथे आलेल्या प्रत्येक ग्राहकाचं बिल आपण भरणार असल्याचं एका माणसाने जाहीर केलं. ही घोषणा ऐकल्यानंतर सर्वांच्या चेहऱ्यावर आश्चर्याचे भाव उमटले. ही व्यक्ती कोण आहे आणि ती असं का करत आहे असा प्रश्न सर्वांना पडला होता. त्या व्यक्तीने आपण सांताक्लॉज असल्याचं सगळ्यांना सांगितलं. खरी आ-ळख सांगितली नाही. पण सांताक्लॉज बनून त्याने सर्वांची बिलं चुकती केली.

या सांताक्लॉजने ख्रिसमसपूर्वीच सर्वांना भेटी दिल्या. हा माणूस कोण होता आणि त्याने असं का केलं असावं, हे अद्याप गुलदस्त्यातच आहे.



युवाराष्ट्र दर्शन
# भंडारा जिल्हा
शुक्रवार दि.०६ फेब्रुवारी २०२६

## वरठी परिसरात माकडांचा उपद्रव, शेतपिकाचे नुकसान

**भंडारा :** मोहाडी तालुक्यातील पाचगाव, डोकेपर (रिठी), मोहगाव (देवी), वरठी, नेरी व परिसरातील गावात मागील दोन वर्षापासून आतापर्यंत सतत मोठ्या संख्येने माकडांचा उपद्रव वाढला आहे. सदर माकडांनी शेतपिकांचे व फळझाडांचे अतोनात नुकसान केलेले असून यामुळे शेतकऱ्यांचे झालेले हजारो रुपयांची नुकसान भरपाई देवून या माकडांनापकडून जंगलात सोडावे, अशी मागणी त्रस्त शेतकरी व नागरिकांनी केली आहे. शेतकऱ्यांच्या शेतातील धुऱ्यावर, वावरात लागवड केलेल्या तूर पिकाचे, पोपट पिकाचे व इतर पिकाचे ९० टक्के ते १०० टक्के नुकसान केले. पिकाचे शेंगा खावून फस्त केल्या, तसेच घरांचे बाडीतील जांब फळाची झाडे, आंबा फळ झाडे व इतर फळ झाडांची फळे खावून फस्त केले. घरावरच्या कवेलू फोडल्या, घरावर झाकलेल्या प्लास्टिक पाल फाडल्या, बागातील वांगे, टमाटर खावून नुकसान केले. शेतकरी आर्थिक संकटात सापडलेला आहे. करिता शेतकऱ्यांचे झालेले नुकसानाची चौकशी करून झालेल्या नुकसानीची भरपाई द्यावी व उपद्रव करणाऱ्या माकडांना पकडून दुर जंगलात सोडण्याची मागणी होत आहे.

युवाराष्ट्र दर्शन
पत्रकार होण्याची सुवर्णसंधी
दैनिक युवाराष्ट्र दर्शन
वृत्तपत्राकरीता भंडारा जिल्ह्यातील लाखनी, लाखांदुर,पवनी येथे तालुका व शहर प्रतिनिधी नेमणे आहे. तसेच गाव पातळीवर वार्ताहर नियुक्त करणे आहे.
संपर्क मो.: ९९२३०७०३९२

# भाजपचा ओबीसी जनगणना केवळ 'निवडणुकीचा जुमला'

## जनगणनेच्या फॉरमॅटमधून ओबीसींचा रकाना गायब - चरण वाघमारे



युवाराष्ट्र दर्शन/ प्रतिनिधी

**भंडारा:** पंतप्रधान आणि सत्ताधारी भाजपने २०२७ च्या जनगणनेत ओबीसींची माहिती घेतली जाणार असल्याची घोषणा करून ओबीसी समाजाची दिशाभूल केली आहे. प्रत्यक्षात केंद्र सरकारने तयार केलेल्या जनगणनेच्या अधिकृत फॉरमॅटमध्ये 'ओबीसी' (इतर मागासवर्गीय) समाजासाठी स्वतंत्र रकानाच (Column) नसल्याने भाजपचा खोटेपणा आणि श्रेय घेण्याचा प्रयत्न उघडा पडला आहे असा घणाघाती आरोप राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) चे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार चरण वाघमारे यांनी केला आहे.

यासंदर्भात प्रसिद्धीला दिलेल्या पत्रकात चरण वाघमारे यांनी काही पुरावे सादर करीत म्हटले की,'काही दिवसांपूर्वी भाजपने ओबीसींची जनगणना होणार म्हणून स्वतःचेच अभिनंदन करून घेत मोठा गाजावाजा केला. मात्र, जनगणना संचालनालयाने जारी केलेल्या ३१ प्रश्नांच्या यादीत कुठेही ओबीसींचा उल्लेख नाही. प्रश्न क्रमांक १३ मध्ये केवळ अनुसूचित जाती (SC) आणि अनुसूचित जमाती (ST) असेच पर्याय आहेत. जो समाज या दोन्हीत बसत नाही, त्याला सरळ 'इतर' मध्ये ढकलले जाणार आहे. मग ओबीसींची स्वतंत्र संख्या कशी कळणार? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे.

वाघमारे यांनी या विषयी काही प्रश्न उपस्थित केले असुन 'जर जनगणना ओबीसींची होणार आहे, तर अर्जामध्ये 'ओबीसी' असा स्वतंत्र शब्द का समाविष्ट करण्यात आलेला नाही?, केंद्र सरकारने २०२१ मध्ये सर्वोच्च न्यायालयात ओबीसी जनगणनेच्या विरोधात प्रतिज्ञापत्र का दिले?, केवळ राजकीय श्रेय घेण्यासाठी ओबीसी समाजाच्या भावनांशी खेळ का केला जात आहे? असा प्रश्न उपस्थित करीत

चरण वाघमारे यांनी स्पष्ट केले की, जोपर्यंत ओबीसींची जातनिहाय जनगणना होत नाही, तोपर्यंत त्यांना लोकसंख्येच्या प्रमाणात हक्क, आरक्षण आणि आर्थिक तरतूद मिळणार नाही. भाजपला ओबीसींचे ध्रुवीकरण जाती-जातींमध्ये होईल अशी भीती वाटत असावी आणि म्हणूनच ते केवळ पोकळ घोषणा करित आहेत.

केंद्र सरकारने २०२७ च्या जनगणनेच्या डिजिटल फॉरमॅटमध्ये तातडीने दुरुस्ती करून 'ओबीसी' कॉलम समाविष्ट न केल्यास राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) राज्यभर तीव्र आंदोलन करून भाजपचा ओबीसी विरोधी चेहरा जनतेसमोर उघडा पाडेल, असा इशाराही चरण वाघमारे यांनी दिला आहे.

# धान खरेदीला मजबुती प्रदान करण्यासाठी राईस मिलर्सचे प्रश्न तात्काळ सोडवा

## भंडारा जिल्हा राईस मिलर्स असो.चे जिल्हाध्यक्ष सुनील फुंडे यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

युवाराष्ट्र दर्शन/ प्रतिनिधी



**भंडारा :** हंगाम २०२५-२६ च्या भात भरडाईला गती मिळणे व शेतकऱ्यांच्या आधारभुत धान खरेदीला मजबुती प्रदान करण्यात यावी यासाठी राईस मिलर्सच्या समस्यांचे तात्काळ निवारण करण्यात यावे अशी विनंतीवजा मागणी भंडारा जिल्हा राईस मिलर्स असोसिएशनचे अध्यक्ष सुनील बाबुराव फुंडे यांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

निवेदनानुसार, शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळण्याकरिता शासनाच्या वतीने आधारभुत धान खरेदी योजना राबविण्यात येते. त्यामध्ये राईस मिलर्स कडून भात भरडाईचे काम करून घेतल्या जाते. करिता या प्रक्रियेमधील राईस मिलर्स हा सुद्धा एक महत्वाचा घटक समजुन त्यांच्या विविध समस्येवरती लक्ष घालुन त्या दुर करणे गरजेचे आहे.

हंगाम २०२५-२६ च्या भरडाई करिता FRK तांदुळ अद्याप उपलब्ध झालेला नाही. तो उपलब्ध करून देण्यात यावी. भरडाई अंती तांदुळ भरण्याकरिता वर्ष २०२५-२६ असा महाराष्ट्र शासनाचा छापा असलेला नवीन B.T. बारदाना अद्याप उपलब्ध झालेला नाही. हंगाम २०२४-२५ व चालु हंगाम करिता वाहतुक दर अद्याप निश्चित झालेले नाही. कुठल्याही व्यक्तिला त्यांना कामाचा मोबदला काय मिळणार हे ते त्याने काम करायचे अगोदर माहिती होणे गरजेचे आहे. आणि त्याकरिता सध्या स्थिति मधील बाजारातील वाहतुक दर लक्षात घेता वाहतुकीचे दर त्वरित निश्चित करून द्यावे. हंगाम २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ या वर्षामध्ये मिलर्सनी संपुर्ण परिश्रम घेऊन भरडाईचे काम पुर्ण करून दिले. अर्थात खरेदी केंद्रावरील धान उचल करून मिलपर्यंत आणणे व उटफ चा भरडाई तांदुळ शासकीय गोदामाला वाहतुक करून जमा केला, मात्र या वर्षामध्ये त्या अगोदरच्या वर्षापेक्षा कमी वाहतुक दर लागु करून जिल्हातील मिलर्स ला कमी वाहतुक दर व जिल्हयाबाहेरील मिलर्सला जादा वाहतुक दर व त्यामध्ये स्थानिक मिलर्सला मोठ्या प्रमाणात नुकसान सहन करावे लागले. आणि येथील उद्योग आर्थिक संकटात आले. करिता त्या वर्षातील वाहतुक दराची दुरूस्ती करून अगोदरच्या वर्षापेक्षा महागाई निदेशांका नुसार देण्यात यावे. हंगाम २०२०-२१ पर्यंत केंद्र सरकार भरडाई करिता मिलर्सला १० रुपये प्रती क्विटल व भरडाईच्या अनुषंगाने मिलर्सला लागणारे नुकसान भरून काढण्यास सहयोग राशी म्हणुन ४० ते १४० रुपये प्रती क्विटल इतर राज्यात देत होते त्याप्रमाणे राज्य शासनसुद्धा आम्हाला देत असे. व या आशेवरती मिलर्स मोठ्या उत्सुकतेने काम करीत असत. परंतु २०२०-२१ पासुन केंद्र सरकारचे व राज्य शासनाचे कुठलेही राशी मिलर्सला प्राप्त झालेली नाही. व त्यामुळे मिलर्स मोठ्या प्रमाणात बँकेचे थकीत होत आहेत. तरी ही राशी त्वरित निश्चित करावे व मिलर्स ला अदा करावी. धान भरण्यासाठी वापरण्यात येणारा बारदाणा हा जुना असतो. व तो मिलर्स कडुन परत घेऊन वर्षानुवर्षे अनेकदा वापरण्यात येतो. जो कुठल्याही प्रकारे वापरण्या योग्य नसतो. तरी सुद्धा बारदाणा परत करताना बारदाणा वापरण्यायोग्य असावा असे नमुद करून परत करणे बंधनकारक केले जाते. अन्यथा त्या करिता मिलर्स कडुन मोठ्या प्रमाणात रक्कम वसुल करण्यात येते. करिता अश्या बारदाण्याचा वसुलपात्र दर बाजार मुल्यानुसार ६ ते ८ रुपये प्रती नग निश्चित करावा. भरडाई करून तयार झालेला तांदुळ जमा करण्याकरिता जिल्ह्यातील शासकीय गोदामाची क्षमता फार कमी आहे. करिता दर वर्षी शासन खाजगी गोदाम भाडे तत्वावर किरायाने घेत असते. मात्र या वर्षी अद्याप अशा प्रकारचे कुठलेही गोदाम घेतलेले नाही. करिता खाजगी गोदाम त्वरित किरायाने घेण्यात यावे. व जमा झालेला तांदुळ वितरण प्रणालीला वाटप करण्याकरिता व इतर जिल्ह्याला पाठविण्यासंबधी जिल्हे जोडून देण्यात यावे.

वरील सर्व समस्यावरती योग्य विचार करून त्या सोडविण्यात याव्या व येथील उद्योगाला बळकटी देऊन स्थानिक रोजगारला संधी द्यावी. व शेतकऱ्यांची आधारभुत खरेदी योजना मजबुत करावी, अशी मागणी सुनील फुंडे यांनी केली आहे. यावेळी माजी राज्यमंत्री नाना पंचबुध्दे, इकबाल सिध्दीकी,नरेंद्र कावळे,सारंग खेडेकर,रोशन सावरबांधे, सेवक भेंडारकर आदि उपस्थित होते.

## आमदार डॉ. परिणय फुके यांची महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठ कार्यकारी परिषदेच्या सदस्यपदी नियुक्ती

युवाराष्ट्र दर्शन/ प्रतिनिधी



**भंडारा :** महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठ, नागपूरच्या (माफसू) कार्यकारी परिषदेवर विधानपरिषदेचे सदस्य आमदार डॉ. परिणय फुके यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

महाराष्ट्र पशु आणि मत्स्यविज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९६ मधील कलम १२ (२) (चौथा) अन्वये ही नियुक्ती करण्यात आली. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाकडून याबाबतचा अधिकृत आदेश २९ डिसेंबर २०२५ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. कार्यकारी परिषद ही विद्यापीठाची सर्वोच्च प्रशासकीय संस्था आहे. यामध्ये कुलगुरू, शासकीय प्रतिनिधी आणि नियुक्त सदस्यांचा समावेश होतो.

विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेचा कार्यकाळ, विद्यापीठाच्या शैक्षणिक, प्रशासकीय तसेच आर्थिक धोरणे ठरविण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असतो. पशुवैद्यकीय शिक्षण, संशोधन, विस्तार सेवा, अभ्यासक्रम विकास, पायाभूत सुविधा, पशुपालक व मत्स्यव्यवसायाशी संबंधित योजनांचे मार्गदर्शन आणि अंमलबजावणीत कार्यकारी परिषदेची निर्णायक भूमिका असते. आमदार डॉ. परिणय फुके हे विदर्भातील सामाजिक, शैक्षणिक व विकासात्मक विषयांमध्ये सातत्याने सक्रिय आहेत. शेतकरी, पशुपालक, दुग्धव्यवसायिक व मत्स्यव्यवसायाशी संबंधित प्रश्नांबाबत त्यांचा अभ्यासपूर्ण दृष्टिकोन असून, विधिमंडळात त्यांनी वेळोवेळी या क्षेत्रातील समस्या व उपाययोजना प्रभावीपणे मांडल्या आहेत. त्यांच्या या अनुभवाचा लाभ विद्यापीठाच्या धोरणनिर्मिती प्रक्रियेला अधिक वेगवान करण्यात महत्वाचा ठरणार असल्याचे मानले जात आहे.

आमदार डॉ. परिणय फुके यांची ही नियुक्ती २७ जुलै २०३० पर्यंत वैध राहणार आहे. या कालावधीत विद्यापीठाच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढ, संशोधनाला चालना, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, तसेच पशुपालक व मत्स्यव्यवसायिकांच्या उत्पन्नवाढीसाठी उपयुक्त उपक्रम राबविण्यासाठी त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. या नियुक्तीमुळे विशेषतः विदर्भातील पशु व मत्स्यविज्ञान शिक्षण संस्था, संशोधन केंद्रे आणि ग्रामीण भागातील पशुपालक व शेतकरी घटकांना थेट लाभ होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## पेवठा येथे पट्टेदार वाघाचा गायीवर हल्ला

युवाराष्ट्र दर्शन/ प्रतिनिधी

**जवाहरनगर :** परिसरातील कोंढी गट ग्रामपंचायत अंतर्गत येत असलेल्या आयुध निमार्णी कारखाना परिसराला लागून असलेल्या व कन्हान नदी किनाऱ्यावरील पेवठा या गावातील शेतकरी व पशुपालक परसराम भाकरू मेश्राम यांचे दोन दुधाळू गाई व एक वासरू गावालगत शेतातील गोठ्यात रात्री पाळीत बांधलेले होते. ४ फेब्रुवारीच्या पहाटे वाघाने यातील मोठ्या गाईवर हल्ला करून घटनास्थळावरून ६० ते ७० फुटावर फरफकटत ओढून नेऊन ठार केल्याची घटना सकाळी उघडकीस आली.

या घटनेची माहिती पशुपालक यांनी पोलीस पाटील चंद्रभान हटवार यांना दिले. त्यांनी या घटनेची माहिती जवाहरनगर पोलीस व भंडारा वनविभाग यांना दिले. लगेच घटनास्थळी वनपरिक्षेत्र अधिकारी भंडारा व्ही. के. बेलखेडे यांचे मार्गदर्शनाखाली वन क्षेत्र सहाय्यक ए. डी. वासनिक, बीट रक्षक शहापूर चे शिरीन शेख, जिवशास्त्रज्ञ शुभम मोदनकर, जलद बचाव पथक वनविभाग भंडारा येथील शरद ताईतकर, अविनाश नागपुरे, शशांक तुरस्कर, अमोल नागरिकर, नरेंद्र उरकुडकर, यांनी घटनास्थळी भेट दिली.

## व्हिजन फॉर यू चॅरिटेबल फाउंडेशनतर्फे आयोजित निःशुल्क प्रशिक्षण शिबिराचा समारोप

युवाराष्ट्र दर्शन/ प्रतिनिधी

**भंडारा :** व्हिजन फॉर यू चॅरिटेबल फाउंडेशनतर्फे दिनांक ०९ डिसेंबर २०२५ पासून अकाउंट्स, फायनान्स, बँकिंग, इन्व्हेस्टमेंट व टॅक्सेशन या विषयांवर आयोजित करण्यात आलेल्या निःशुल्क प्रशिक्षण शिबिराचा समारोप कार्यक्रम दिनांक ०४ फेब्रुवारी २०२६ रोजी संस्थेच्या कार्यालयात पार पडला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून भंडारातील सुप्रसिद्ध डॉ. शुभम कटकवार (संचालक, भंडारा सिटी डेंटल क्लिनिक) तसेच पंकज हाडगे (नगरसंघचालक व निवृत्त बँक अधिकारी) हे उपस्थित होते. यावेळी संस्थेचे मुख्य प्रशिक्षक चार्टर्ड अकाउंटंट पंकज मुंधडा यांचीही उपस्थिती लाभली.

समारोपप्रसंगी प्रशिक्षणार्थींनी प्रशिक्षणादरम्यान आलेले अनुभव व मिळालेल्या ज्ञानाविषयी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी डॉ. शुभम कटकवार यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत प्रशिक्षण वर्गातून मिळालेल्या शिकवणीचा प्रत्यक्ष जीवनात उपयोग करून यश संपादन करण्यासाठी मार्गदर्शन व प्रेरणा दिली. तसेच श्री पंकजजी हाडगे यांनी व्हिजन फॉर यू चॅरिटेबल फाउंडेशनकडून प्रेरणा घेऊन सर्व विद्यार्थ्यांनी समाजासाठी स्वतःहून लोककल्याणकारी कार्य करण्याचे आवाहन केले.

उपस्थित मान्यवरांनी व्हिजन फॉर यू चॅरिटेबल फाउंडेशनतर्फे आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचे कौतुक करून असे प्रशिक्षण प्रकल्प भविष्यातही सातत्याने सुरू ठेवण्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या शेवटी प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. संस्थेच्या वतीने पंकज मुंधडा यांनी उपस्थितांचे आभार मानले व भविष्यात अधिकाधिक विद्यार्थ्यांनी अशा प्रशिक्षण शिबिरांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

## लाखनी येथे नेत्राचिकित्सा शिबीर

**लाखनी :** स्थानिक श्रीमंत रामकृष्णबापू खेडीकर फाउंडेशन तर्फे पदमश्री डॉ. महात्मे नेत्र रुग्णालय व नेत्रपेढी नागपूर यांच्या संयुक्त सहकार्याने स्वागत लॉन लाखनी येथे दि. ७ फेब्रुवारीला सकाळी ११ ते ३ वाजेपर्यंत नेत्र तपासणी व मोतीयाबिंदू शस्त्रक्रियेचे शिबिर आयोजित केले आहे. शिबिरात मोतीबिंदू, काचबिंदू, दृष्टीबिंदू ,शस्त्रक्रिया, नेत्रतपासणी व नेत्रदान याविषयी मार्गदर्शन केले जाणार आहे .

## शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये धान खरेदीची १०२.३ कोटी रक्कम जमा

**भंडारा :** धान खरेदीदार संस्थांकडून खरीप पणन हंगाम २०२५-२६ मध्ये आधारभूत किमत खरेदी योजने अंतर्गत भंडारा जिल्हयामध्ये शेतकऱ्यांकडुन धान खरेदी करण्यात आलेली आहे. या धानाचे शेतकरी चुकार दि. ०४/०२/२०२६ रोजी ४४५.९८ कोटी प्राप्त झालेले असुन जिल्हा पणन अधिकारी, भंडारा मार्फत शेतकरी चुकारे रक्कम अदा करण्याचे कार्यवाही सुरु असून दि. ०५/०२/२०२६ रोजी पर्यंत १०२.०३ कोटी शेतक-यांच्या खात्यामध्ये वर्ग करण्यात आलेले आहे. तसेच उर्वरीत शेतकरी चूकार दोन दिवसात अदा करण्यात येईल, अशी माहिती श्री. एस. एस. पाटील, जिल्हा पणन अधिकारी भंडारा यानी दिली आहे.

## मोहरी येथे जि.प. शाळेसमोरील नाला बांधकामाची मागणी

युवाराष्ट्र दर्शन/ प्रतिनिधी

**पवनी :** तालुक्यातील मौजा मोहरी येथे जिल्हा परिषद शाळा समोरील नाला बांधकामाची मागणी मागील अनेक वर्षापासुन नागरीकांकडुन होत असुन नागरीकांनी भाजपा चे ता उपाध्यक्ष मंगेश बोरकर यांचे कडे त्या संदर्भात निवेदनसुध्दा देण्यात आले होते.



प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने दि ३ फेब्रुवारी २०२६ रोजी सायं दरम्यान भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी मोहरी येथे भेट देवुन नागरीकांना भासणारी अडचण समजून घेत आमदार.डॉ. परिणय फुके यांच्या माध्यमातून लवकरच सदर नाला बांधकाम करण्याचे आश्वासन देण्यात आले.

यावेळी भाजपा तालुका अध्यक्ष तिलक वैद्य, भाजपा तालुका उपाध्यक्ष मंगेश बोरकर, सोनू बावणकर उपाध्यक्ष न प पवनी, सुरेश अवसरे न. प. गटनेते, पंकज देशमुख , मोहरी गावचे गौरव बावनकर, प्रणय भोवते,रोशन जांगळे ,सौरभ शहारे, युवराज लांजेवार,रवी लांजेवार ,स्वप्निल लांजेवार, धनपाल लांजेवार शाळा व्यवस्थापक अध्यक्ष ,अभिषेक बनसोड स्वप्नील कांबळे,करण पोहनकर, अक्षय लांजेवार, गोपाल लांजेवार, गौरव शहारे व गावातील तरुण व नागरिक उपस्थित होते.

# जकातदार विद्यालयाच्या प्रांगणात शब्दांचा जागर

## • भंडारा ग्रंथोत्सवाचा थाटात शुभारंभ • लेझीमचा ताल आणि ग्रंथदिंडीने वेधले शहरवासीयांचे लक्ष

युवाराष्ट्र दर्शन/ प्रतिनिधी

**भंडारा :** 'पुस्तके ही केवळ कागदाची पाने नसून ती ज्ञानाचा जिवंत वारसा आहेत. जिल्ह्यातील वाचन संस्कृती अधिक वृद्धिंगत करण्यासाठी प्रशासनाचा मानस असून, येणाऱ्या काळात जिल्ह्यातील ग्रामीण भागात प्रत्येक गावी ग्रंथालय निर्मिती करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत' असे प्रतिपादन जिल्हाधिकारी सावनकुमार यांनी केले. महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाद्वारे आयोजित 'भंडारा ग्रंथोत्सव २०२५' च्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

स्थानिक जिल्हा परिषद जकातदार विद्यालयाच्या प्रांगणात आयोजित या दोन दिवसीय ग्रंथ महोत्सवाचे उद्घाटन जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. यावेळी मंचावर अध्यक्ष म्हणून ज्येष्ठ साहित्यिक ज्ञानेश वाकुडकर, नगराध्यक्ष मधुरा मदनकर, जिल्हा माहिती अधिकारी शैलजा दांदळे, जिल्हा नियोजन अधिकारी तारकेश्वरी बोरिगिट्टे आदी मान्यवर उपस्थित होते.

### प्रारंभी भव्य ग्रंथदिंडी

उद्घाटनापूर्वी सकाळी ९ वाजता जकातदार विद्यालयापासून भव्य ग्रंथदिंडी काढण्यात आली. लेझीमचा निनाद, बँड पथक आणि 'ग्रंथ आमचे गुरु' अशा घोषणांनी शहराचा परिसर दुमदुमला होता. नूतन कन्या विद्यालय, महिला समाज शाळा व जकातदार विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या शिस्तबद्ध लेझीम संचलनाने भंडारावासियांची मने जिंकली. ही दिंडी महात्मा गांधी चौकापर्यंत जाऊन पुन्हा ग्रंथप्रदर्शन स्थळी विसर्जित झाली.



या सोहळ्याला डॉ. गुरुप्रसाद पाखमोडे, गजानन कोठेवार, संजय नारनवरे घनश्याम कानतोडे, इस्तारी मेंढे, विकास निमकर यांच्यासह मोठ्या संख्येने वाचक आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. नरेश आंबिलकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन बाळासाहेब मुंडे यांनी मानले. जकातदार विद्यालयाचे प्रांगण सध्या विविध विषयांच्या हजारो पुस्तकांनी सजले असून, पुस्तक खरेदीसाठी भंडाऱ्यातील वाचकांनी गर्दी केली आहे.

### अध्यक्षांचे परखड भाष्य....

कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक ज्ञानेश वाकुडकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात वर्तमान राजकीय आणि सामाजिक स्थितीवर अत्यंत निर्भीडपणे भाष्य केले. साहित्याने समाजाला दिशा दिली पाहिजे, असे सांगतानाच त्यांनी व्यवस्थेतील त्रुटींवर परखड ताशेरे ओढले. त्यांच्या या भाषणामुळे उपस्थित साहित्यानुरागींमध्ये वैचारिक चर्चा रंगली.

### 'ज्ञानसागर' स्मरणीकेचे प्रकाशन

याप्रसंगी 'ज्ञानसागर' या विशेष स्मरणिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. जिल्हा ग्रंथालय अधिकारी खुमेंद्र भोपचे यांनी प्रास्ताविकातून ग्रंथोत्सवाच्या आयोजनामागची भूमिका विषद केली. जकातदार विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी स्वागतगीत आणि राज्यगीताचे सादरीकरण केले.

युवाराष्ट्र दर्शन

(७)

# वर्धा

शुक्रवार, ०६ फेब्रुवारी २०२६

जिल्हा

## सेलूतील विकास चौकात बस-दुचाकीचा भीषण अपघात ; धानोलीचा युवक गंभीर जखमी

**सेलू, :** सेलू शहरातील गजबजलेल्या विकास चौकात आज राज्य परिवहन महामंडळाच्या बस आणि दुचाकीच्या धडकेत एक ४० वर्षीय युवक गंभीर जखमी झाला, मंगेश मडावी (रा. धानोली, मेंघे, ता. सेलू) असे जखमी युवकाचे नाव असून, त्याची प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी सेवाग्राम येथील रुग्णालयात हलविण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, माहूर आगाराची महामंडळ बस क्रमांक एम. एच. १४, एलएक्स. ८३३० वर्ध्यावरुन नागपूरकडे जात होती, याचवेळी हिंगणी-घोराड मार्गावरुन येणारा मंगेश मडावी हा आपल्या स्पलेंडर दुचाकी (क्रमांक एम. एच. ३२, ए. ९५९२) वरुन अचानक उजवीकडे वळला, दुचाकी थेट बससमोर आल्याने जोरदार धडक होऊन भीषण अपघात घडला, अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तात्काळ जखमी मंगेशला सेलू ग्रामीण रुग्णालयात दाखल केले, मात्र, डोक्याला व शरीराला गंभीर इजा झाल्याने प्राथमिक उपचारानंतर त्याला सेवाग्राम रुग्णालयात रेफर करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच सेलू पोलिस ठाण्याचे कर्मचारी निरंजन वरभे, मंगेश राऊत व तुषार भोंबे यांनी घटनास्थळी धाव घेतली, पोलिसांनी बस चालक, वाहक व प्रत्यक्षदर्शीकडून माहिती घेतली असून दोन्ही वाहने ताब्यात घेतली, पुढील तपास सुरू आहे.

# सोन्याचे दागिने असल्याचे भासवून १० लाखांनी फसवणूक

## गुन्ह्तील आरोपीला अटक, ८ लाख ४४ हजारांचा मुद्देमाल जप्त



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. ०५**

बनावटी पिवळ्या धातुचे दागीने सोन्याचे असल्याचे भासवुन इसमाची १० लाखांनी फसवणूक करणाऱ्या आरोपींचा गुजरात व महाराष्ट्र राज्यात शोध घेत आरोपी मंगल अमर सोळंकी, वय (२८) रा. कुबेर नगर, अहमदाबाद ह.मु बालाजी नगर, मानेवाडा रोड, नागपूर, व राजकुमारी विष्णु पवार, वय (५४) वर्ष, रा. सुलतानपुरी, दिल्ली, ह.मु दत्तुजी हातागडे याचे घरी किरायाने प्लॉट क्रमांक १५, बालाजी नगर, मानेवाडा, नागपुर येथे मिळून आले.त्यांना अटक करुन त्यांचे ताब्यातुन एकुण ८लाख ४४हजार ८९९ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

आरोपींनी २१रोजी वर्धा बस स्थानकजवळ पैसे आणून दया व सोने घेवुन जा असे सांगीतले, दरम्यान संजय आचटकर पत्नीसह बजाज चौक, वर्धा येशील रामदेव बाबा मंदीराजवळ आले व त्यांनी सोने विकी करणारे आरोपींना तेथे बोलावीले व तेथे व संजय आचटकर या पती पत्नीस आरोपींनी त्यांचे जवळील कापडी पिशवीतील ठेवून असलेले पिवळया धातुचे बारीक मणी असलेल्या माळा दाखवील्या त्या काल दाखवील्याप्रमाणे खऱ्या सोन्याचे असल्याचे सांगीतल्यावरुन संजय आचटकर यांनी नगदी १०लाख रुपयांना दिले तेव्हा ते तिघेही लगेच तेथून निघुन गेले. त्यांनतर फिर्यादी याने त्या माळेतील चार-पाच मणी काढून सराफा लाईन येथे ज्वेलर्स दुकानासमोरील कारागीरास दाखवून चेक केले असता ते नकली असल्याचे सांगीतले. संजय आचटकर यांना आपली १० लाखाने फसवणूक झाल्याचे लक्षात येताच संजय आंचटकर, रा. मांडगाव यांनी शहर पो.स्टेला तक्रार दिली. तकारी वरुन अप क्रमांक ६१/२०२६ कलम ३१८(४), ३(५) भा. न्या. स. २०२३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला गुन्हयाचा समांतर तपास स्थानीक गुन्हे शाखा, वर्धा तर्फे करण्यात येत असतांना संजय आचटकर यांनी आरोपींचा मोबाईलव्दारे काढलेल्या फोटोवरुन माहीती प्राप्त केली असता आरोपी मंगल अमर सोलंकी, रा. कुबेरनगर, अहमदाबाद राज्य गुजरात याचा असल्याची माहीती प्राप्त झाल्याने वरीष्ठांच्या आदेशावरुन देवुन दोन पथक अहमदाबाद राज्य गुजरात येथे रवाना झाले.आरोपी हा मागील चार महीण्यांपासून मानेवाडा, नागपुर (महाराष्ट्र) येथे त्यांचे परीवारासह राहत असल्याबाबतची माहीती प्राप्त झाल्याने गुजरात येथुन दिनांक ०३ फेब्रुवारी रोजी नागपुर येथे परत येवुन बालाजी नगर मानेवाडा, नागपुर परीसरात आरोपी राहत असलेल्या ठिकाणी जावुन पाहणी केली असता आरोपी मंगल अमर सोलंकी, वय (२८)रा. कुबेर नगर, अहमदाबाद राज्य गुजरात ह.मु बालाजी नगर, मानेवाडा रोड, नागपूर, व २ राजकुमारी विष्णु पवार, वय(५४) वर्ष, रा. सुलतानपुरी, दिल्ली, ह.मु दत्तुजी हातागडे याचे घरी किरायाने प्लॉट क्रमांक १५, बालाजी नगर, मानेवाडा, नागपुर येथे मिळून आले. त्यांना गुन्हयाबाबत विचारले असता त्यांनी गुन्हा हा त्यांचा तिसरा साथीदार बबलु राजेश राठोड, रा. ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा नागपूर याचे सह केल्याचे सांगीतल्याने त्यांचे ताब्यातुन व घरझडतीत नगदी ७लाख २१हजार ४०० रू., दोन पिवळया धातुने (नकली सोन्याच्या) गोल मनी असलेल्या माळा अंदाजे वजन २ किलो ग्रॅम प्रती किलो १०हजाररू प्रमाणे २०हजार रु एक अॅन्ड्राईड व एक किपॅड चा मोबाईल किंमत २३हजार ४९९ रू एम.एच. ४९ वि. एच. ६१९०क्रमांकाची दुचाकी कि. ८०हजार रू. असा एकुण ८लाख ४४हजार ८९९ रू. चा मुद्देमाल दोन्ही आरोपींचे ताब्यातुन जप्त करण्यात आला. आरोपींना शहर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. आरोपी मंगल सोळंकी हा गुन्हे करण्याचे सवईचा असुन त्यांचे कडुन अशा प्रकारचे ईतरही ठिकाणी केलेले गुन्ह उघडकीस येण्याची दाट शक्यता आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभ अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे, यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक विनोद बौधरी, सहायक पोलिस निरीक्षक आशिषसिंग ठाकुर, पोलिस उपनिरीक्षक विजयसिंग गोमलाइ, चंद्रकांत बरगे, सचिन इंगोले, भुचन निघोट, प्रमोद पिसे, मपोहवा निलीमा उमक, अमोल नगराळे, मंगेश चावरे, राहुल अधवाल, रितेश गेटमे, दिनेश बोचकर, गोविंद मुंडे आदींनी केली.

# मयुरा काळे बिझनेस आयकॉन अवॉर्डने सन्मानीत

## सिने अभिनेत्री प्रार्थना बेहरे यांचे हस्ते पुरस्कार प्रदान



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. ०५**

औद्योगीक क्षेत्रात मयुरा अमर काळे या करीत असलेल्या कार्याचा व त्यांनी गृहीणी म्हणून सर्व जबाबदाऱ्या सांभाळून आपला स्वत:चा उद्योग टाकून त्यातही त्यांनी आपली कार्यकुशलतेच्या भरवश्यावर एक सफल उद्योजिका म्हणून आपल्या उद्योगाला जे नावारुपास आणले. आधार उद्योगाच्या माध्यमातून धरा अमृत या नावाने लाकडी घाण्यावर तेल उत्पादन सुरु झाले व हे तेलाची गुणवत्ता व शुध्दता या भरवश्यावर लगेचच हे उत्पादन नावारुपास येऊन याची महाराष्ट्र राज्य स्तरावर दखल घेत त्यांच्या उद्योगाची महाराष्ट्र बिझनेस आयकॉन अवार्ड-२०२५ पुरस्काराकरीता निवड करण्यात आली.


हा पुरस्कार सिने अभिनेत्री प्रार्थना बेहरे यांचे हस्ते मयुरा अमर काळे यांना प्रदान करीत त्यांना सन्मानीत करण्यात आले. त्यावेळी सिनेअभिनेत्री सोनाली कुळकर्णी, वर्षा उसगांवकर यांची प्रमुख उपस्थिती होती.तसेच त्यांचा मुलगा अजिंक्य काळे उपस्थित होता.

सन २००६ मध्ये आधार उद्योगाची निर्मिती झाली. यामध्ये अनेक अडचणी आल्यात यश-अपयशाबरोबरच उद्योग क्षेत्रातील नवनविन आव्हाने पण स्त्री म्हणून स्वत:चे अस्तीत्व निर्माण करण्याच्या ज्या ध्येयाने पछाडलेल्या मयुरा हार कशी मानणार. आज जिल्हयात एक प्रसिध्द उद्योजीका म्हणून नावारुपास आल्या. त्यांच्या उद्योगात होणारी उत्पादने देशपातळीवरच नाही तर बाहेर देशात सुध्दा मोठया आवडीने लोक खरेदी करुन घेऊन जातात. यातच त्यांच्या सफलतेचे रहस्य आहे. आज 'धरा अमृत'? हे केवळ तेलाचे नाव राहिले नसून, ते शुध्दता आणि विश्वासाचे प्रतीक बनले आहे. आपल्या व्यवसायातून अनेक महिलांना रोजगार देऊन त्यांना सन्मानाने जगायला शिकवणे, हे मयुरा काळेंचे हे सर्वात मोठे यश आहे.

आज जो पुरस्कार मयुरा काळे यांना मिळाला आहे, तो केवळ त्यांच्या व्यवसायाचा सन्मान नाही, तर त्यांनी आजवर दाखवलेल्या सहनशीलतेचा, कष्टाचा आणि त्यांच्या धैर्याचा हा एक विनम्र गौरव आहे. मयुरा काळे यांचा हा प्रवास येणाऱ्या पिढीतील अनेक महिलांसाठी प्रेरणादायी ठरेल, यात शंका नाही. अशा या कर्तृत्ववान स्त्री मयुरा काळे यांना हा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.


## निधन वार्ता

### सूर्यकुमार गांधी



**वर्धा,:** येथील माहेश्वरी मंडळाचे विश्वस्त आणि प्रसिद्ध इलेक्ट्रॉनिक्स व्यापारी सूर्यकुमार गांधी (७९) यांचे गुरुवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, स्नुषा, एक मुलगी, जावई, दोन भाऊ असा परिवार आहे.

### शशिकला देशपांडे



**वर्धा:** स्थानिक गणेश कॉलनी येथील शशिकला वामन देशपांडे (८०)यांचे ५ फेब्रुवारी रोजी गुरुवारी सकाळी ८ वाजता वृद्धापकाळाने राहत्या घरी निधन झाले. त्यांच्यावर स्थानिक हिंदू स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे बहीण आणि बराच मोठा परिवार आहे.

## जलजीवन मिशन व जल पुरवठा विभागातील कर्मचाऱ्याचे वेतन रखडले

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. ०५**

जिल्हा परिषद जल पुरवठा व स्वच्छता विभागांतर्गत स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) आणि जलजीवन मिशनमध्ये कार्यरत असलेल्या ठेकेदारी कर्मचाऱ्यांना गेल्या अनेक महिन्यांपासून वेतन मिळालेले नाही, शासनाकडे वारंवार पाठपुरावा करुनही वेतन न मिळाल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला असून त्यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे.

जिल्हा स्तरावर तज्ज्ञ व सल्लागार, तर तहसील स्तरावर गट समन्वयक व समूह समन्वयक म्हणून काम करणारे कर्मचारी नियमित सेवा देत आहेत, जलजीवन मिशनमधील १० व जल पुरवठा व स्वच्छता विभागातील ८ असे एकुण १८ कर्मचारी या समस्येला सामोरे जात आहे, यातील काही कर्मचाऱ्यांची नुकतीच कायमस्वरूपी नियुक्ती झाली आहे.

चार महिन्यापासून वेतन न मिळाल्याने कर्मचाऱ्यांची आर्थिक स्थिती अत्यंत बिकट झाली आहे, घरखर्च, शिक्षण व दैनंदिन गरजा भागवणे कठीण झाले असून अनेक कर्मचाऱ्यांवर कर्जाचा भार वाढला आहे, वेतनाच्या प्रतीक्षेत असलेल्या कर्मचाऱ्यांनी आता आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्याची तयारी दर्शविली आहे.

या प्रकरणामुळे विभागाच्या कामाकाजावरही परिणाम झाला असून पिण्याच्या पाण्याच्या योजना तसेच प्रशासकीय दैनंदिन कामकाज ठप्प होण्याची भीती व्यक्त केली जात आहे, संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने वेतनाचा प्रश्न सोडवावा, अशी मागणी कर्मचाऱ्यांनी केली आहे.

## भारतीय ज्ञानपरंपरेचे अभ्यासक्रमात एकीकरण शैक्षणिक पुनर्जागरणाचा कार्यक्रम : प्रो. कविता होले

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. ०५**

महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयात विश्वविद्यालय अनुदान आयोग व शिक्षण मंत्रालयाच्या भारतीय ज्ञानपरंपरा विभागाच्या सहकार्याने भारतीय ज्ञानपरंपरेचे अभ्यासक्रमात एकीकरण या विषयावर आयोजित सहा दिवसीय मूलभूत प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटनसत्रात कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक येथील संस्कृत भाषा व साहित्य विभागाच्या अधिष्ठाता तसेच अभ्यासक्रमाच्या पर्यवेक्षक प्रो. कविता होले यांनी मार्गदर्शन केले.

राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार रोजगाराभिमुख शिक्षण देण्याच्या उद्देशाने भारतीय ज्ञानपरंपरेचा अभ्यासक्रमात समावेश करण्याचा हा उपक्रम शैक्षणिक पुनर्जागरणाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरेल, असे त्यांनी नमूद केले. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये भारतीयतेची आत्मजाणीव निर्माण होईल तसेच नवोन्मेषाला



प्रोत्साहन मिळेल, असेही त्या म्हणाल्या. २ ते ७ फेब्रुवारी दरम्यान आयोजित या प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन सोमवार, २ फेब्रुवारी रोजी गालिब सभागृहात झाले. या वेळी सेंट व्हिन्सेंट पालोती ईंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजी महाविद्यालय, नागपूर येथील सहायक प्रोफेसर व यूजीसी मास्टर ट्रेनर डॉ. प्रफुल्ल तरवटकर यांनी कार्यक्रमाची रूपरेषा मांडली. मालवीय मिशन शिक्षक प्रशिक्षण केंद्राचे संचालक व साहित्य विद्यापीठाचे अधिष्ठाता प्रो. अवधेश कुमार यांनी सांगितले की, भारतीय चिंतनपरंपरेचा अभ्यासक्रमात समावेश करणे हा या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या संकल्पनेनुसार हा अभ्यासक्रम तयार करण्यात आला असून त्यामध्ये आयुर्वेद विज्ञान व तंत्रज्ञानाचाही समावेश आहे. प्रशिक्षण कार्यक्रमात विश्वविद्यालयातील शिक्षक व शोधार्थीसह इतर राज्यांतील ४० हून अधिक शिक्षक व शोधार्थी सहभागी झाले आहेत. प्रशिक्षणादरम्यान दररोज चार व्याख्याने आयोजित करण्यात येणार असून अंतिम दिवशी परीक्षा घेण्यात येईल. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्ज्वलन, सरस्वतीच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून तसेच कुलगीताने झाली. मान्यवरांचे स्वागत स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ व सुतमाळ देऊन करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन जनसंचार विभागाचे सहायक प्रोफेसर व कार्यक्रम समन्वयक डॉ. संदीप कुमार वर्मा यांनी केले तर दर्शन व संस्कृती विभागाचे सहायक प्रोफेसर व कार्यक्रम समन्वयक डॉ. रणंजय कुमार सिंह यांनी आभार मानले.

## अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी नीट, सीईटी व जेईई मार्गदर्शनाची चाळणी परीक्षा

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. ५**

अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना वैद्यकीय व अभियांत्रिकी प्रवेश परीक्षांचे मार्गदर्शन मिळावे, यासाठी आदिवासी विकास विभागामार्फत शैक्षणिक सत्र २०२६-२७ मध्ये नीट तसेच सीईटी व जेईई अभ्यासक्रम मार्गदर्शनासाठी चाळणी परीक्षा घेण्यात येणार आहे. विद्यार्थी, पालक, संबंधित शाळेचे मुख्याध्यापक यांनी चाळणी परीक्षेचे अर्ज एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातून प्राप्त करुन घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

दहावी नंतर दोन वर्षांच्या कालावधीत शासकीय आश्रमशाळांमध्ये नामवंत खाजगी प्रशिक्षण संस्थांच्या सहाय्याने प्रवेश परीक्षांचे मार्गदर्शन देण्यास शासनाने मान्यता दिली आहे. जिल्ह्यात मुलींसाठी शासकीय माध्यमिक आश्रमशाळा सिंदी विहिरी (ता. कारंजा) येथे, तर मुलांसाठी कळमनुरी प्रकल्पातील शासकीय आश्रमशाळा गोटेवाडी येथे मार्गदर्शन केंद्र सुरू करण्यात आले आहे. या योजनेसाठी शासकीय व अनुदानित आश्रमशाळा तसेच मान्यताप्राप्त माध्यमिक शाळांमधील अनुसूचित जमातीचे विद्यार्थी, जे मार्च २०२६ मध्ये इयत्ता १० वीची परीक्षा देत असून नीट किंवा सीईटी, जेईई परीक्षेस इच्छुक आहेत, ते पात्र असतील. अर्ज परिपूर्ण भरुन दिनांक १५ फेब्रुवारी पर्यंत सादर करावेत. अधिक माहितीसाठी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, जिल्हा न्यायालयाच्या मागे, सिव्हिल लाईन, वर्धा येथे संपर्क साधावा, असे आवाहन प्रकल्प अधिकारी गितांजली निकम यांनी कळविले आहे.

# डिजिटल विश्वात एआय साक्षरता आवश्यक

## राष्ट्रीय परिसंवादात वक्त्यांचे मत

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, ०५**

महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयातील भाषा प्रौद्योगिकी व भाषा अभियांत्रिकी विभाग, भाषा विद्यापीठ यांच्या वतीने 'कृत्रिम बुद्धिमत्ता : शिक्षण, समाज आणि नवोन्मेष' या विषयावर दोन दिवसीय प्री-समिट राष्ट्रीय परिसंवादाचे उद्घाटन ०५ फेब्रुवारी रोजी कस्तुरबा सभागृहात करण्यात आले. उद्घाटन सत्रात उपस्थित एआय तज्ज्ञ वक्त्यांनी आजच्या डिजिटल विश्वात एआय साक्षरता अत्यंत आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. एआय एकीकडे आव्हान असले तरी दुसरीकडे रोजगाराच्या अनेक संधीही निर्माण करतो. येणाऱ्या काळात सर्व आव्हाने स्वीकारत एआयसह पुढे जाणे गरजेचे आहे, असे त्यांनी नमूद केले.



उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाषा विद्यापीठाच्या अधिष्ठाता व परिसंवाद संचालक प्रो. प्रीती सागर होत्या. यावेळी भारतीय माहिती तंत्रज्ञान संस्था, नागपूर येथील सहायक प्रोफेसर डॉ. वसुधंरा राठोड यांनी एआयची सोप्या शब्दांत माहिती देत सांगितले की, दैनंदिन जीवनात कुठल्या ना कुठल्या स्वरूपात एआयचा वापर करत असतो. एआय आपल्याला सहायक म्हणून मदत करतो; मात्र मानवी बुद्धिमत्ता ही यंत्रबुद्धिमत्तेची जागा घेऊ शकत नाही. त्यांनी उदाहरणांसह विविध एआय मॉडेल्सची चर्चा केली. डॉ. श्रवण चांडक यांनी एआयमुळे स्वस्त पर्याय उपलब्ध होत असून त्याचा उपयोग कृषी व आरोग्य क्षेत्रात होऊ शकतो. एआयमुळे रोजगार व उत्पादकता दोन्ही वाढतील. कृषी क्षेत्रात शीतगृहांच्या माध्यमातून उत्पादन खराब होण्याचे प्रमाण कमी होऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढू शकते. डॉ. अर्पित यादव यांनी ऑनलाइन माध्यमातून 'जनरेटिव्ह एआय आणि उद्योग व समाजातील बदल' या विषयावर आपले विचार मांडले. डॉ. तौसीफ दीवान यांनी मल्टी-मोडल डेटाची आवश्यकता, झिरो-शॉट लर्निंग, प्रॉम्प्ट्स आदी विषयांवर चर्चा करत त्यांची उपयुक्तता स्पष्ट केली.

अध्यक्षीय भाषणात प्रो. प्रीती सागर म्हणाल्या की एआय ही आजच्या पिढीसाठी आव्हान असली तरी त्या आव्हानांचा सामना करणे अपरिहार्य आहे. सकारात्मक दृष्टिकोन ठेवून एआय स्वीकारणे आवश्यक असून एआय कधीही माणसाच्या वर असू शकत नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्ज्वलन व कुलगीताने झाली. पाहुण्यांचे स्वागत विद्यापीठाच्या प्रतीकचिन्हाने करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. हर्षलता पेटकर यांनी केले, तर डॉ. अंजनी कुमार राय यांनी आभार मानले. या वेळी प्रो. जनार्दन कुमार तिवारी, डॉ. बालाजी चिरडे, डॉ. रवींद्र बोरकर, डॉ. एच. ए. हुनगुंद, डॉ. अमरेंद्र कुमार शर्मा, डॉ. दिव्या शुक्ला, आनंद भारती, डॉ. विजय सिंह, डॉ. अंजना, सागर इखे, डॉ. तुफान सिंह पारधी, डॉ. हेमलता गोडबोले, डॉ. प्रवेश द्विवेदी, बी. एस. मिरगे यांच्यासह शोधार्थी व विद्यार्थी उपस्थित होते.

# पक्षीनिरीक्षण उपक्रम राबवून जागतिक पाणथळ दिवस साजरा

## बोर व्याघ्र प्रकल्प व बहारचे आयोजन



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. ०५**

बोर व्याघ्र प्रकल्पाद्वारे बहार नेचर फाउंडेशनच्या सहकार्याने रिधोरा धरण परिसरात पक्षीनिरीक्षण व स्वच्छता अभियान राबवत जागतिक पाणथळ दिन साजरा करण्यात आला.

या उपक्रमांतर्गत बोर व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रातील रिधोरा धरणाच्या जलाशयावर विविध प्रकारच्या पाणपक्ष्यांची नोंद करण्यात आली. यावेळी परिसरात राजहंस या स्थानिक स्थलांतरीत पक्ष्याचा थवा सुमारे ७०च्या संख्येत पाणथळ ठिकाणी दिसून आला. त्यासोबतच चक्रवाक, नदी सुरय, कवड्या खंड्या, पाणकावळा, काळा शराटी, गायबगळा, ढोकरी, शेकाट्या, चिखल्या, टिटवी आदी पाणथळ व दलदलीच्या ठिकाणी आढळणाऱ्या पक्ष्यांची नोंद घेण्यात आली.

बोर व्याघ्र प्रकल्पाचे उपसंचालक मंगेश ठेंगडी व मानद वन्यजीव रक्षक संजय इंगळे तिगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या उपक्रमात वनपरिक्षेत्र अधिकारी रूपेश खेडकर, क्षेत्रसहाय्यक वसंत खेलकर, पद्माकर ठवरी, वनरक्षक राजू ढोबाळे, तुमडाम, बहारचे पदाधिकारी दीपक गुढेकर, राजदीप राठौर, राहुल तेलरांधे, सुरज बोदिले, सुर्वी, सुवीर बोदिले यांचा सक्रिय सहभाग होता.

### नायलॉन व प्लास्टिक निर्मूलन म्हणजे वन्यजीवांना जीवनदान

मासेमारीसाठी कंत्राटदारांना दिल्या जाणाऱ्या जलाशयातील नायलॉनचे जाळे कंत्राट संपल्यानंतरही अनेकदा तसेच पडून राहतात. या जाळयांमध्ये अडकून अनेक पक्षी व लहान वन्यजीव मृत्यूमुखी पडतात. कंत्राटी काम संपल्यावर मासेमारांना जाळे पूर्णतः काढून नेण्याचे निर्देश देण्यात यावेत. तसेच, निसर्ग संवर्धनासाठी कार्यरत संस्थांना सोबत घेऊन जलाशय परिसरातील प्लास्टिक व अन्य कचऱ्याचे निर्मूलन केल्यास पाणपक्षी व इतर वन्यजीवांना जीवनदान प्राप्त होईल.

**संजय इंगळे तिगावकरमानद वन्यजीव रक्षक**

## भारतातील वाढत्या दीर्घकालीन श्वसन विकारांचे व्यवस्थापन करण्यासाठी त्याचे लवकर आणि अचूक निदान होणे महत्त्वाचे: वैद्यकीय तज्ञांचे मत

**नागपूर, ५ फेब्रुवारी :** आरोग्यसेवेतील नवोपक्रमांची ९० वर्षे साजरी करत असतानाच, फुफ्फुसांच्या आरोग्याच्या निदानासाठी भारतातील पहिली समर्पित निदान सुविधा असणारे सिप्लाचे ब्रीदफ्री लंग वेलनेस सेंटर देशभरात लवकर आणि सुलभ श्वसन काळजी उपलब्ध करून देण्याच्या दिशेने एक अग्रगण्य पाऊल आहे. सद्यस्थितीला भारत वाढत्या सार्वजनिक आरोग्य आव्हानाचा सामना करत आहे, यामध्ये दीर्घकालीन श्वसनविकार (सीआरडीएस) हे देशातील असंसर्गजन्य रोगांच्या (एनसीडीएस) वाढत्या प्रमाणासाठी जबाबदार असलेल्या प्रमुख दोन कारणांपैकी एक आहे. १ चिंताजनक बाब म्हणजे, श्वसनविकारामुळे (सीआरडीएस) होणाऱ्या जागतिक मृत्यू आणि अपंगत्व-समायोजितआयुर्मान पैकी ३०% पेक्षा जास्त वाटा या देशाचा आहे. २ या धक्कादायक आकडेवारीनंतरही, भारत अजूनही निदान न झालेल्या एका मूक साथीच्या रोगाशी झुंज देत आहे, ज्यामध्ये तीव्र दम्याची लक्षणे असलेल्या सुमारे ७०% लोकांचे निदान होत नाही आणि अंदाजे ९५९८% सीओपीडी प्रकरणांचेही निदान होत नाही.

## अदाणी एंटरप्रायझेस लिमिटेडने आर्थिक वर्ष २६ च्या पहिल्या ९ महिन्यांचे निकाल जाहीर केले

**अहमदाबाद, ५ फेब्रुवारी :** अदाणी समूहाची प्रमुख कंपनी असलेल्या अदाणी एंटरप्राइजेस लिमिटेड (एईएल) ने आज ३१ डिसेंबर २०२५ रोजी संपलेल्या तिमाही आणि नऊ महिन्यांचे निकाल आज जाहीर केले.

या तिमाहीत, एईएलने अधिग्रहणाच्या पाच वर्षांपेक्षा कमी कालावधीत ग्रीनफिल्ड नवी-मुंबईविमानतळावर कामकाज सुरू करून, सातत्याने उत्कृष्ट कार्यक्षमता आणि प्रकल्प अंमलबजावणीतील उत्कृष्ट कामगिरी करण्याचा आपला विक्रम अधिक मजबूत केला आहे. एईएल ने दोन एचएएम रस्ते प्रकल्प पूर्ण करून आणि गुवाहाटी विमानतळावरील एकात्मिक नवीन टर्मिनल इमारतीचे उद्घाटन करून, ठरलेल्या वेळेत यशस्वीपणे कामे पूर्ण केली आहेत.

मजबूत अंमलबजावणी आणि स्पष्ट धोरणात्मक दृष्टिकोनामुळे, अदाणी एंटरप्राइझने आर्थिक वर्ष २६ च्या पहिल्या नऊ महिन्यांत दमदार परिचालन कामगिरी केली आहे, जी आमच्या इनक्यूबेटर मॉडेलची ताकद आणि वैविध्यपूर्ण पायाभूत सुविधांच्या पोर्टफोलिओची खोली दर्शवते, असे अदाणी समूहाचे अध्यक्ष गौतम अदाणी म्हणाले.

## आरआर काबेलतर्फे काबेल स्टार सीझन ४ चे विजेते जाहीर



**नागपूर, ५ फेब्रुवारी :** भारतातील आघाडीची ग्राहक विद्युत उपकरणे तसेच वायर आणि केबल उत्पादक कंपनी आरआर काबेल यांनी नागपूर येथे काबेल स्टार शिष्यवृत्ती कार्यक्रम २०२५ च्या विजेत्यांची अभिमानास्पद घोषणा केली. उद्योगक्षेत्रातील एक अग्रगण्य उपक्रम असलेला हा शिष्यवृत्ती कार्यक्रम इलेक्ट्रीशियनसच्या यावर्षी १० वीची परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण केलेल्या मुलांसाठी विशेषतः तयार करण्यात आला आहे. शिक्षित आणि सक्षम भारत या आरआर काबेलच्या दृष्टीकोनाशी सुसंगत राहून या कार्यक्रमांतर्गत दरवर्षी १ कोटी रु. हून अधिक निधी देऊन या होतकरू विद्यार्थ्यांच्या उच्च माध्यमिक शिक्षणाला प्रोत्साहन व पाठबळ दिले जाते. आतापर्यंत देशभरात जवळपास ४००० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली असून प्रत्येकाला १०,००० रु. इतकी वैयक्तिक शिष्यवृत्ती देण्यात आली आहे. या गुणवंत विद्यार्थ्यांना उच्च माध्यमिक शिक्षणासाठी केवळ आर्थिक आधार मिळाला आहे एवढेच नाही तर आपल्या स्वप्नांची पूर्तता करण्याच्या दिशेने त्यांनी एक महत्वाचे पाऊल उचलले आहे.

## सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत विवाहित मुलीसाठी माहेर हे कायमचे घर असल्याचा संदेश

**मुंबई, ५ फेब्रुवारी :** सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल ही मालिका आपल्या प्रेरणादायी कथानक आणि आपल्याशी नाते सांगणाऱ्या व्यक्तिरेखांमुळे प्रेक्षकांची मने जिंकत आहे. मालिकेतील प्रमुख पात्र पुष्पा (करुणा पांडे) हिच्या दैनंदिन संघर्ष आणि विजयांचे सुंदर चित्रण या मालिकेला सर्वाधिक लोकप्रिय कौटुंबिक मनोरंजनापैकी एक बनवते. अलीकडील एका प्रसंगात पुष्पा आणि तिची मुलगी राशी (अक्षया हिंदळकर) यांच्यातील नात्याचे दर्शन घडते, ज्यातून हे अधोरेखित होते की आयुष्य कितीही अस्थिर झाले तरी आईचे घर हे मुलीसाठी सर्वात सुरक्षित आश्रयस्थान असते. मालिकेत दाखवलेला हा हृदयस्पर्शी क्षण आईच्या निःस्वार्थ ऊब, संरक्षण आणि दिलासा यांचे दर्शन घडवतो.

## सोनी सबवरील गणेश कार्तिकिय मालिकेत गिरीजात्मज कथा साकारली जाते



**मुंबई, ५ फेब्रुवारी :** सोनी सबवरील पौराणिक गाथा गाथा शिव परिवार की गणेश कार्तिकेय ही मालिका भगवान गणेश (निरण्य समाधिया) यांच्या दिव्य प्रवासाचे चित्रण करते, जिथे ते सिंधुरासुराने निर्माण केलेल्या दोषांना सामोरे जातात. अष्टविनायकातील चिंतामणी अध्याय संपत असताना मत्सराचा नवा दोष उगम पावतो. पवित्र गुहेत भगवान गणेशांचा सामना मत्सरासुराशी (अनवर खान) होतो, जो ईर्षा आणि द्वेषाने प्रेरित आहे.

भगवान गणेश पवित्र चिंतामणी परत मिळवून त्याचा गैरवापर थांबवतात आणि न्याय व शहाणपणाचा धडा शिकवतात. हा अध्याय संपताच कथा अधिक भावनिक प्रवासाकडे वळते.

## ऋषी सक्सेना यांनी सोनी सबच्या इत्ती सी खुशी मधील थप्पड सीन शूट करताना झालेल्या घबराटीची आठवण सांगितली



**मुंबई, ५ फेब्रुवारी :** सोनी सबचा इत्ती सी खुशी अन्विता (सुम्बुल तौकीर खान) हिच्या भावनिक प्रवासाचे चित्रण करतोएक निस्वार्थी तरुणी जी आपल्या भावंडांसाठी पालकाची भूमिका निभावते. जीवनातील कठीण प्रसंगांत कुटुंबाला आधार देण्यापासून ते प्रेम आणि विवाहाच्या आव्हानांना सामोरे जाण्यापर्यंत, अन्विताने नेहमीच आपल्या कुटुंबाला एकत्र ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. कथानक जसजसे पुढे सरकते, तसतसे प्रेक्षक अन्विता आणि तिचा पती संजय (ऋषी सक्सेना) यांच्यातील क्षण पाहत आहेत, जे केवळ नाट्यमयच नाहीत तर अत्यंत भावनिकही आहेत. ऋषी सक्सेना यांनी त्या दृश्याचे चित्रीकरण करताना झालेला अनुभव सांगितला, मी यापूर्वीही अनेक तीव्र दृश्ये केली आहेत, पण यावेळी परिस्थिती वेगळी होती आणि मला थोडी घबराट होत होती कारण मला एका स्त्रीला थप्पड मारायची होती.

## डीएसपी म्युच्युअल फंडातर्फे डीएसपी नेत्र आधारित डीएसपी मल्टी ॲसेट ओम्नी फंड ऑफ फंड्सचा शुभारंभ

**मुंबई, ५ फेब्रुवारी :** डीएसपी म्युच्युअल फंडाने गुंतवणूकदारांसाठी आज डीएसपी मल्टी ॲसेट ओम्नी फंड ऑफ फंड्स हा नवीन फंड आणला आहे. ही नवीन योजना मुदतमुक्त श्रेणीतील फंड ऑफ फंड प्रकारची योजना आहे. शेअरबाजारातील घडामोडींचा सतत मागोवा घेणे, कोणत्या प्रकारात कधी आणि किती निधी गुंतवायचा अथवा शेअरबाजाराच्या वेगवेगळ्या चढउतारांदरम्यान विविध पर्यायातील गुंतवणूकीच्या व्यवस्थापनाबाबत स्वतःहून निर्णय घेणे शक्य नसणाऱ्या व्यक्तींसाठी गुंतवणूक सुलभ करणे, हा या फंडाचा उद्देश आहे. नवीन फंडाची ऑफर (एनएफओ) ५ फेब्रुवारी २०२६ रोजी गुंतवणूकीसाठी खुली होणार असून येत्या १९ फेब्रुवारी २०२६ रोजी बंद होणार आहे.

# पत्रकारांच्या मानसिक आरोग्यासाठी

# ‘महाराष्ट्र पत्रकार मेडिटेट्स’

### ‘व्हॉईस ऑफ मीडिया’ व ‘द आर्ट ऑफ लिव्हिंग’ यांच्या संयुक्त विद्यमाने १० दिवस चालणार उपक्रम

### श्री. श्री. रविशंकरसह राज्यातील मान्यवर संपादक, पदाधिकारी करणार मार्गदर्शन.

युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी
मुंबई, दि. ५

लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून माध्यमांची भूमिका अत्यंत महत्त्वाची मानली जाते. मात्र या भूमिकेची जबाबदारी पार पाडताना आजच्या काळात पत्रकारांना प्रचंड मानसिक तणावाला सामोरे जावे लागत आहे. चोवीस तास बातम्यांचा पाठलाग, सततच्या डेडलाईन्स, विश्रांती शिवाय करावे लागणारे फील्ड वर्क, तसेच वैयक्तिक व कौटुंबिक जबाबदाऱ्यांची ओढाताण याचा थेट परिणाम पत्रकारांच्या मानसिक व शारीरिक आरोग्यावर होताना दिसत आहे.

ही गंभीर बाब लक्षात घेऊन ‘व्हॉईस ऑफ मीडिया’ ‘व्ही ओ एम’ इंटरनॅशनल फोरम यांच्या वतीने आणि ‘द आर्ट ऑफ लिव्हिंग’ यांच्या सहकार्याने ‘महाराष्ट्र पत्रकार मेडिटेट्स’ हा १० दिवसांचा विशेष ऑनलाईन मेडिटेशन उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. पत्रकारांना मानसिक शांतता, सकारात्मक ऊर्जा आणि तणावमुक्त जीवनशैलीचा अनुभव देणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

सलग १० दिवस गुरुदेव श्री. श्री. रविशंकर गुरुजीसह राज्यातील मान्यवर संपादक, पदाधिकारी करणार मार्गदर्शन करणार आहेत.

‘द आर्ट ऑफ लिव्हिंग’ चे आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक सलील पुळेकर हे सर्व शेषन लीड करणार आहेत.

हा उपक्रम दि. २३ फेब्रुवारी २०२६ ते दि. ४ मार्च २०२६ या कालावधीत दररोज सकाळी ७ ते ८ या वेळेत ऑनलाईन स्वरूपात होणार आहे. या दहा दिवसांच्या कार्यक्रमात महाराष्ट्रातील तसेच देशातील विविध नामवंत संपादक, ज्येष्ठ पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते व ‘व्हॉईस ऑफ मीडिया’च्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती लाभणार आहे.

कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी, दि. २३ फेब्रुवारी रोजी महासागर मीडिया ग्रुपचे संपादक-संचालक श्रीकृष्ण चांडक प्रमुख उद्घाटक म्हणून सहभागी होणार असून, व्हॉईस ऑफ मीडिया व्ही ओ एम इंटरनॅशनल फोरमचे प्रदेशाध्यक्ष अनिल म्हस्के यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या सत्राचे अध्यक्षपद शेतकरी संघटनेचे नेते रविकांत तुपकर भूषवणार आहेत.

दि. २४ फेब्रुवारी रोजी लोकशाहीचे संपादक विशाल पाटील प्रमुख उद्घाटक म्हणून सहभागी होतील. व्हॉईस ऑफ मीडिया व्ही ओ एम इंटरनॅशनल फोरमचे राज्य उपाध्यक्ष अजित दादा कुंकूलोळ प्रमुख उपस्थिती म्हणून लाभणार असून, राष्ट्रीय संघटक सारिका महोत्रा अध्यक्षस्थान भूषवतील.

दि. २५ फेब्रुवारी रोजी ज्येष्ठ पत्रकार व संपादक तुळशीदास भोईटे प्रमुख उद्घाटक असतील. व्हॉईस ऑफ मीडिया व्ही ओ एम इंटरनॅशनल फोरमचे संचालक व मुख्य संयोजक गोरक्षनाथ मदने यांची प्रमुख उपस्थिती राहील, तर संचालक व्यंकटेश जोशी कार्यक्रमाचे अध्यक्ष असतील. दि. २६ फेब्रुवारी रोजी पुढारी न्यूज टीव्हीचे संपादक प्रसन्न जोशी प्रमुख उद्घाटक म्हणून सहभागी होतील. व्हॉईस ऑफ मीडिया व्ही ओ एम इंटरनॅशनल फोरमचे संचालक व संयोजक किशोर कारंजेकर प्रमुख उपस्थिती म्हणून लाभणार असून, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या गोदावरी बँक समूहाच्या अध्यक्षा राजश्री पाटील अध्यक्षपद भूषवतील. दि. २७ फेब्रुवारी रोजी एबीपी माझाच्या संपादक सरिता कौशिक प्रमुख उद्घाटक असतील. व्हॉईस ऑफ मीडिया व्ही ओ एम इंटरनॅशनल फोरमच्या प्रदेशाध्यक्ष रश्मी मारवाडी यांची प्रमुख उपस्थिती राहणार असून, उद्योजक व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते राणा सूर्यवंशी कार्यक्रमाचे अध्यक्ष असतील. दि. २८ फेब्रुवारी रोजी लोकमतचे संपादक धर्मराज हल्लाळे प्रमुख उद्घाटक म्हणून सहभागी होतील. व्हॉईस ऑफ मीडिया व्ही ओ एम इंटरनॅशनल फोरम प्रदेश कार्याध्यक्ष नरेंद्र देशमुख यांची प्रमुख उपस्थिती राहणार असून, उद्योजक व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते वैभव वानखडे अध्यक्षस्थान भूषवतील. दि. १ मार्च रोजी फ्री प्रेस जर्नल, नवशक्तीचे समूह राजकीय संपादक रविकिरण देशमुख प्रमुख उद्घाटक असतील. व्हॉईस ऑफ मीडिया व्ही ओ एम इंटरनॅशनल फोरम प्रदेश कार्याध्यक्ष विजय चोरडिया प्रमुख उपस्थिती म्हणून सहभागी होतील, तर उद्योजक व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या शिल्पा शेटे अध्यक्षपद भूषवतील. दि. २ मार्च रोजी मॅक्स महाराष्ट्रचे संपादक रवींद्र आंबेकर प्रमुख उद्घाटक म्हणून सहभागी होतील. विभागीय अध्यक्ष संगम कोटलवार प्रमुख उपस्थिती राहणार असून, व्हॉईस ऑफ मीडिया व्ही ओ एम इंटरनॅशनल फोरमचे आरोग्य विंग प्रमुख भीमेश मुतुला अध्यक्षस्थान भूषवतील. दि. ३ मार्च रोजी ज्येष्ठ पत्रकार अशोक वानखडे प्रमुख उद्घाटक असतील. प्रदेश कार्याध्यक्ष कुमार कडलक प्रमुख उपस्थिती म्हणून लाभणार असून, उत्तर महाराष्ट्र विभागीय अध्यक्ष कल्पेश महाले अध्यक्षपद भूषवतील. कार्यक्रमाच्या समारोपाच्या दिवशी, दि. ४ मार्च रोजी ज्येष्ठ पत्रकार विश्वास देवकर प्रमुख उद्घाटक म्हणून सहभागी होतील. ‘व्हॉईस ऑफ मीडिया’ व्ही ओ एम इंटरनॅशनल फोरमचे सर्व विंग प्रमुख अमोल मतकर मान्यवर उपस्थिती म्हणून लाभणार असून, राष्ट्रीय कोषाध्यक्ष चेतन बंडेवार कार्यक्रमाचे अध्यक्ष असतील. सर्वांना सहभागीना प्रमाणपत्र मिळेल, सर्वांना खास बक्षीस दिले जाणार आहेत. ‘महाराष्ट्र पत्रकार मेडिटेट्स’ हा उपक्रम पत्रकारांसाठी केवळ ध्यानधारणेचा कार्यक्रम नसून, त्यांच्या मानसिक आरोग्याची जपणूक करणारा, तणावमुक्त व सकारात्मक पत्रकारितेकडे नेणारा एक महत्त्वाचा प्रयत्न असल्याचे मत ‘व्हॉईस ऑफ मीडिया’ व्ही ओ एम इंटरनॅशनल फोरम कडून व्यक्त करण्यात आले आहे.

कार्यक्रमात सहभागी कसे व्हायचे?

‘महाराष्ट्र पत्रकार मेडिटेट्स’ हा १० दिवसांचा ऑनलाईन मेडिटेशन उपक्रम पूर्णतः मोफत असून महाराष्ट्रातील तसेच देशातील सर्व पत्रकार, संपादक, माध्यम क्षेत्रातील कर्मचारी आणि मीडिया विद्यार्थ्यांसाठी खुला आहे. ‘व्हॉईस ऑफ मीडिया’ व्ही ओ एम इंटरनॅशनल फोरमच्या सदस्य आणि पदाधिकारीसाठी खास व्यवस्था, सुविधा करण्यात आली आहे. सहभागी होण्यासाठी इच्छुकांनी ‘व्हॉईस ऑफ मीडिया’ व्ही ओ एम इंटरनॅशनल फोरमच्या व्हॉट्सॲप ग्रुप अथवा सोशल मीडिया माध्यमांद्वारे नोंदणी करणे आवश्यक आहे.

नोंदणी पूर्ण झाल्यानंतर सहभागी सदस्यांना कार्यक्रमाची झूम ऑनलाईन लिंक संबंधित माध्यमातून पाठविण्यात येईल. कार्यक्रम दररोज सकाळी ७ ते ८ या वेळेत ऑनलाईन स्वरूपात होणार असून सहभागी सदस्यांनी वेळेआधी लॉग-इन करण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

अधिक माहितीसाठी व नोंदणीसाठी ‘व्हॉईस ऑफ मीडिया’च्या जिल्हा व विभागीय पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. ‘व्हॉईस ऑफ मीडिया’च्या वेबसाईटवर सर्व माहिती आहे. https://aoliv.in/voiceofmedia इच्छुकांनी या लिंकवर नोंदणी करण्याची आहे.

VOICE OF MEDIA

THE ART OF LIVING


## कार्यालय नगर परिषद डिगडोह (देवी)

ता. हिंगणा, जि. नागपूर

दूरध्वनी क्र.०७१०४-२९७७४९ E-Mail-comcdigdoh@gmail.com

जा.क्र./नपडि/कर विभाग / ७५९/२०२५-२६ दि.:०५/०२/२०२६

माहे फेब्रुवारी २०२६

**मालमत्ता फेरफार बाबत जाहिरनामा**

मालमत्तेचे फेरफार करण्याबाबत अर्जदारांनी कार्यालयात अर्ज सादर केलेले आहे.

| अ.क्र | सध्या नगरपरिषद रेकॉर्डवर असलेले नाव | वार्ड क्र. | मालमत्ता क्र. व ठिकाण | अर्जदाराचे नाव | फेरफार करीता सादर केलेले दस्तावेज |
|---|---|---|---|---|---|
| १ | धीरज उद्धवराव पाटील | ५ | ज्ञानदीप नगर ४२१५ | १) यशवंत फुशन लेजे २) अमित यशवंत लेजे | रजिस्टर विक्रीपत्र |
| २ | दारव्हेकर प्रसन्ना प्रकाशराव | १ | मेश्राम ले आउट १४३३ | श्रीमती रमा विकूल भुरे | रजिस्टर विक्रीपत्र |
| ३ | १ चंद्रभागाबाई सखाराम इंगळे, २ शशिकलाबाई देवराव घेबदे | १ | गेडाम ले आउट १७९७ | दिनेश नामदेवराव जवजाळ | रजिस्टर विक्रीपत्र |
| ४ | भटकर अनिल तुळशीराम | ३ | संजय नगर ५२९० | सावन श्रीमराव महाजन | नोटरी इमला कब्जापत्र |
| ५ | गोदावरी गोपाळराव नेमाडे | ५ | श्रीकृष्ण नगर ४९३४ | १) गोपाल कृष्णा नेमाडे १) विकास गोपाळराव नेमाडे ३)अरुण गोपाळराव नेमाडे | रजिस्टर वारसानपत्र |
| ६ | सिरमवार अशोक सीताराम | १ | लोकमान्य नगर २३९० | रोहित शेषराव काकडे | रजिस्टर विक्रीपत्र |
| ७ | बोदिले फैलाश गिरी | ६ | एकात्मता नगर ६००१ | १) संतोषी ज्ञानेश्वर गिरी २) पूजा नरेंद्र पर्वते | रजिस्टर वारसान पत्र |
| ८ | शशिकांत शंकरराव पोकळे तर्फे आमु. १) मोहिनी राजेंद्रराव टिंगणे २)सरिता श्रावणराव पोकळे (सरिता प्रकाशराव चिखलकर) | ५ | सारक नगर ३३८३ | सरिता ओमप्रकाशराव चिखलकर | रजिस्टर विक्रीपत्र |
| ९ | शशिकांत शंकरराव पोकळे तर्फे आमु. १) मोहिनी राजेंद्रराव टिंगणे २)सरिता श्रावणराव पोकळे (रारिता प्रकाशराव चिखलकर) | ५ | सारक नगर ३३८३ | मोहिनी राजेंद्रराव टिंगणे | रजिस्टर विक्रीपत्र |
| १० | श्रीमती गीता नरेंद्र श्रीवास तर्फे आमु, देशमुख दिलीप महादेवराव | ३ | दुर्गा नगर २५१/१ | देशमुख दिलीप महादेवराव | रजिस्टर विक्रीपत्र |
| ११ | राजेश जगदीश पांडे | ३ | दुर्गा नगर २३६/१ | देशमुख दिलीप महादेवराव | रजिस्टर विक्रीपत्र |
| १२ | लाडेकर खेमराज बळीराम सौ. करुणा खेमराज | ५ | विजय ना ३६७४ | १) निरुता फैलाश नैताम २) प्रदीप कैलाश नैताम ३) प्रदीप कैलाश नेताम | रजिस्टर विक्रीपत्र |
| १३ | शैलेंद्र प्रभाकर सतदेवे व सविता शैलेंद्र सतदेवे | ५ | विजय नगर ३६५८/१ | प्रदीप रामदास सोनटक्के | रजिस्टर विक्रीपत्र |
| १४ | राजेंद्र बाबुराव फाळके व स्मिता राजेंद्र फाळके | १ | रायटाऊन १४०८/ बी.बी.विंग-१/३०९ | बबिता हेमचंद्र पटले | रजिस्टर विक्रीपत्र |
| १५ | पार्वतीबाई गुलाबराव निकोरे | ५ | पाडुरंग नगर-३१६० | पुष्पलता गुलाबराब निकोरे (पुष्पलता पाळकृष्ण फोलते ) | नोटरी बक्षीसपत्र |
| १६ | प्रकाशकुमार बजरंगप्रसाद बूबना | १ | लोकमान्य नगर २४७५ | नितीन मुन्नालाल बनिया | रजिस्टर विक्रीपत्र |
| १७ | राजपूत श्रीमती गंगादेवी बिन्देश्वरी सिंग | ४ | पारधी नगर ८४५ | १) बलवीर विन्देश्वरी सिंग २) ठाकूर रणधीर बिन्देश्वरी सिंग ३) रणजीत बिन्देश्वरी सिंग ४) जगजीत बिन्देश्वरी सिंग ठाकूर ५) मीना जितेंद्र सिंग ६) श्याग मिथिलेश सिंग ७) सीमा नारायण सिंग ८) शीला दामोदर सिंग (उमा कमलेश सिंग) १) ओमजी दामोदर सिंग १०) राधा मनोज सिंग चौहान | रजिस्टर वारसान पत्र |
| १८ | जलाराम मंगलम | ४ | पारधी नगर ९७१ | विणल धर्मेंद्र कटारिया | रजिस्टर विक्रीपत्र |
| १९ | जलाराम मंगलम | ४ | पारधी नगर ९७१ | धर्मेंद्र द्वारकादास कटारिया | रजिस्टर विक्रीपत्र |
| २० | जलाराम मंगलम | ४ | पारधी नगर ९७१ | धर्मेंद्र द्वारकादारा कटारिया | रजिस्टर विक्रीपत्र |
| २१ | जलाराम मंगलम | ४ | पारधी नगर ९७१ | छाया धर्मेंद्र कटारिया | रजिस्टर विक्रीपत्र |
| २२ | जलाराम गंगलम | ४ | पारधी नगर ९७१ | छाया धर्मेंद्र कटारिया | रजिस्टर विक्रीपत्र |
| २३ | जलाराम मंगलम | ४ | पारधी नगर ९७१ | पायल विणल फटारिया | रजिस्टर विक्रीपत्र |
| २४ | गुंजेकर विनोद नत्थूजी | १ | रायटाऊन १४०८/बी.बी. /विंग-१/४०९ | अभिषेक आनंदकुमार बाघमारे | रजिस्टर विक्रीपत्र |
| २५ | ठाकूर महाकांत चित्तेवर | ४ | ट्रक्टर क. चौक ५४४१ | ईश्चरकुमार महाकांत ठाकूर | नॉटरी वारसानपत्र व नोटरी हक्कासोड लेख |
| २६ | प्रेम बळीराम राठोड | १ | मेश्राम ले आउट १४३१/७ | पवन विष्णुजी खडसे | रजिस्टर विक्रीपत्र |
| २७ | उत्कर्ष गृह निर्माण सह. संस्था ली. तर्फे आमु. धारगावे रूपलाल प्रभुलाल | ५ | वैशाली नगर ३१०४ | उत्कर्ष गृह निर्माण सह, संस्था ली. तर्फे आमु. सौ. तरूणा योगेंद्र भोयर | रजिस्टर विक्रीपत्र |
| २८ | गृह विकास को.ऑ.सो. तर्फे अध्यक्ष / सचिव पखीदडे कांतीलाल हरिभाऊ तर्फे आमु. बच्छे महेश भिला सौ. ओमेगा महेश बच्छे | ५ | विजय नगर ३६८६ | बच्छे महेश भिला | रजिस्टर विक्रीपत्र |
| २९ | श्रीकृष्ण गृह नि.सह.संस्था तर्फे आमु. लोनबैले वेणूताई भाऊराव लोनबैले श्रीकांत भाऊराव | ५ | वैशाली नगर ३०८२ | श्रीकृष्ण गृह नि. सह.संस्था तर्फे आमु. श्रीकृष्ण ताराचंद वैद्य | रजिस्टर आमु. पत्र |
| ३० | धनजय भरतलाल रहांगडाले | ६ | इंदिरा माता नगर ७२६१ | जितेंद्र बाबुराव शाहारे | नोटरी इमला कब्जाजापत्र |
| ३१ | वर्षेकर सौ. रेखा नत्थुलाल | ६ | इंदिरा माता नगर ६५७५ | वर्षेकर नीलिमा नत्थुलाल | नोटरी वारसानपत्र |
| ३२ | जलाराम मगलम | ४ | पारधी नगर ९७१ | सौ. नीता सुधाकर शिंगणे | रजिस्टर विक्रीपत्र |
| ३३ | जलाराम मंगलम | ४ | पारधी नगर ९७१ | समीर अमूल्य चक्रबोर्ती | रजिस्टर विक्रीपत्र |
| ३४ | चंद्रशेखर भुजंगराव देशमुख | १ | लोकमान्य नगर २२७९ | १) स्नेहा घद्रशेखर देशमुख २) प्रतिक चंद्रशेखर देशमुख ३) सिद्धश चंद्रशेखर देशमुख | रजिस्टर वारसान पत्र |

उपरोक्त नमुद गालमत्तेवरील वारसान व त्या व्यतिरिक्त ज्यांच्या हक्क असेल त्यांनी सदरहू मालमत्तेबाबत कोणताही आक्षेप असल्यास हा जाहीरनामा नगर परिषदच्या फलकावर प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन आवश्यक दरताएवजासह लेखी आक्षेप ७ दिवसांचे आत मुख्याधिकारी नगर परिषद डिगडोह (देवी) ला सादर करावा. नमूद मुदतीच्या आत कोणत्याही स्वरूपाचे आक्षेप प्राप्त न झाल्यास वर नमूद अर्जाचे अनुषंगाने दायित्व बदलविण्याचा निर्णय घेण्यात येईल. तरी संबंधितांनी नोंद घ्यावी.

स्वा/-
मुख्याधिकारी नगरपरिषद डिगडोह (देवी)



RNI NO. MAHMAR/ 2008/26657

This daily has been printed by Sagar Harishprasad Kothari, printer and publisher on behalf of Shri Sai Prakashan, Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and has been published at Yuvarashtra Darshan office, Opposite Old Navbharat, Cotton Market, Nagpur 440018. **Editor:** Sagar Harishprasad Kothari (responsible for editorial as per PRB act). The editor might not necessarily agree with the content published in the newspaper. Disputes if arising, shall be settled under the jurisdiction of Nagpur based courts. Group Editor : Sandeep Ramrao Kale Office Phone No: 7447735851



RNI NO. MAHMAR/ 2008/26657



हे पत्र मालक श्री. साई प्रकाशनकरिता मुद्रक, प्रकाशक - सागर हरिषप्रसाद कोठारी यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून युवाराष्ट्र दर्शन कार्यालय, जुना नवभारत समोर, कॉटन मार्केट, नागपूर ४४००१८ येथे प्रसिद्ध केले. संपादक : सागर हरिषप्रसाद कोठारी (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबावदारी यांच्यावर) वृत्तपत्रातील मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. कुठलाही वाद नागपूर न्यायालयांतर्गत. समूह संपादक : संदीप रामराव काळे. कार्यालय फोन : ७४४७७३५८५१